सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १९ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नितीशकुमार उद्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार

### पीएम मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सह अनेक नेते राहणार उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९पटना**

बिहारमधील नवीन एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा उद्या (२० नोव्हेंबर) पाटण्यातील ऐतिहासिक गांधी मैदानावर होणार आहे. त्यापूर्वी, आज एनडीए ची महत्वाची बैठक पार पडली, ज्यात नितीश कुमारयांना विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवडण्यात आले आहे. म्हणजेच, नितीश कुमार मुख्यमंत्री होणार, यावर आज अखेर शिक्कामोर्तब झाला आहे.

एनडीए आमदारांची बिहार विधानसभेच्या इमारतीत बैठक झाली. भाजप नेते सम्राट चौधरी यांनी नितीश कुमार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, जो एकमताने मंजूर करण्यात आला. आता नितीश कुमार राजभवनात जाऊन राजीनामा देतील आणि सरकार



स्थापनेचा दावा करतील. तर, उद्या सकाळी भव्य शपथविधी सोहळ्यात १० व्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. त्यांच्यासोबत सम्राट चौधरी आणि विजय सिंहा उप-मुख्यमंत्रिपदाची शपत घेतली.

पाटण्यातील ऐतिहासिक गांधी मैदानावर शपथविधी समारंभ होणार आहे. या कार्यक्रमाची व्यापक तयारी सुरू आहे. एनडीएचे अनेक वरिष्ठ नेतेही या समारंभात सहभागी होतील. स्वतः नितीश कुमारांनी मंगळवारी या सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी गांधी मैदानाला भेट दिली होती.

**उद्याला शपथविधी सोहळा**

गांधी मैदानावर शपथविधी सोहळा होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित राहणार आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे भजन लाल शर्मा आणि महाराष्ट्राचे देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार विजेते, शास्त्रज्ञ, साहित्यिक आणि इतर उपस्थित राहणार आहेत.

**एनडीए शक्तीप्रदर्शन करणार, ३ लाख लोक जमणार**

शपथविधी सोहळ्यासोबतच, एनडीए गांधी मैदानावर देखील शक्तीप्रदर्शन करणार आहे. ३ लाखहून अधिक लोकांना एकत्र आणण्याची तयारी सुरू आहे. जेडीयू, भाजप, आरएलएसपी आणि एचएएमचे कार्यकर्ते आणि नेते यासाठी कामावर आहेत. प्रत्येक आमदार ५ हजार लोकांना पटना येथे घेऊन जाईल.

**एसपीजीकडे सुरक्षा सोपवण्यात आली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. परिणामी, एसपीजी गांधी मैदानाच्या सुरक्षेची जबाबदारी घेत आहे. २५० हून अधिक दंडाधिकारी, २५० पोलिस अधिकारी आणि २५०० हून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. गांधी मैदानाभोवती असलेल्या उंच इमारतींवर स्नायपर्स तैनात करण्यात आले आहेत.


## निवडणूक आयोगाला बदनाम करण्याचा प्रयत्न

### देशातील २७२ प्रतिष्ठित व्यक्तींचा पत्रातून काँग्रेसवर निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष सातत्याने निवडणूक आयोगावर टीका करत आहेत. या पार्श्वभूमीवर देशातील २७२ दिग्गज व्यक्तींनी मंगळवारी एक खुले पत्र प्रसिद्ध करून आयोगाला स्पष्ट पाठिंबा दर्शवला आहे. यात माजी न्यायाधीश, निवृत्त सनदी अधिकारी, राजदूत आणि माजी सैन्य अधिकाऱ्यांचासमावेश आहे. या पत्रातून विरोधकांवर जाणीवपूर्वक आयोगाची विश्वासहार्यता धूसर करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

या खुल्या पत्रात एकूण २७२ प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले असून त्यात १६ माजी न्यायाधीश,




१२३ निवृत्त सनदी अधिकारी, १४ माजी राजदूत आणि १३३ माजी सैन्य अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यांच्या मते, बिना पुराव्याचे आरोप करून संविधानिक संस्थांना कमजोर करण्याचा एक राजकीय पद्धतशीर प्रयत्न सातत्याने केला जात आहे. भारतीय लोकशाही आज बाहेरील हल्ल्यांमुळे नव्हे, तर विषारी राजकीय वक्तव्यांमुळे मोठ्या आव्हानासमोर उभी असल्याचे यात म्हटले आहे.


विरोधक निवडणूक आयोगाविरोधात पुरावे असण्याचा दावा करतात, परंतु आयोगाकडे कोणतीही औपचारिक तक्रार किंवा प्रतिज्ञापत्र दाखल करत नाहीत. यावरुनच हे आरोप निव्वळ राजकीय रणनीतीचा भाग असल्याचे स्पष्ट होते. पत्रात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अलीकडील विधानांचा उल्लेख आहे, ज्यात त्यांनी निवडणूक आयोगावर मत चोरीचा आरोप केला होता. अशा प्रकारचे वक्तव्य अधिकाऱ्यांना दबावाखाली आणण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते, असेही पत्रात म्हटले आहे.

## भारताला 'हिंदू राष्ट्र' घोषित करण्याची गरज नाही

### हिंदू म्हणजे अशी व्यक्ती जी...- मोहन भागवत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९गुवाहाटी**

ज्या व्यक्तीला भारताचा अभिमान वाटतो, ती प्रत्येक व्यक्ती हिंदूच आहे. हिंदू धर्माची ओळख केवळ धार्मिक नसून ती एक सभ्यतेची ओळख आहे. भारत आणि हिंदू एकच आहेत. भारत मूळतः 'हिंदू राष्ट्र'च आहे. त्यामुळे भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची वेगळी गरज नाही, असे स्पष्ट मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडले. गुवाहाटी येथे एका सभेला संबोधित करताना ते बोलत होते.




**भारताची सभ्यता हे हिंदू राष्ट्राची ओळख**

मोहन भागवत म्हणाले, भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची गरज नाही. भारताच्या संस्कृतीतून आधीच हिंदू राष्ट्राचे प्रतिबिंब दिसते. हिंदू धर्म हा केवळ एक धार्मिक शब्द नाही तर हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेत रुजलेली एक सभ्यतेची ओळख आहे. भारत आणि हिंदू हे समानार्थी आहेत. भारताला 'हिंदू राष्ट्र' होण्यासाठी कोणत्याही अधिकृत घोषणेची आवश्यकता नाही. भारताची सभ्यता हेच त्याचे प्रमाण आहे.

**संघ म्हणजे काय? भागवत म्हणतात...**

संघाची स्थापना कोणाचाही विरोध करण्यासाठी किंवा हानी पोहोचवण्यासाठी झाली नाही, तर प्रत्येकाच्या स्वयंशिस्तीसाठी आणि चारित्र्य निर्माणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी झाली. भारताला जगात आघाडीवर नेण्याच्या उद्देशाने संघ कार्यरत आहे. भारताला 'वर्ल्ड लीडर' बनवण्यात योगदान देण्यासाठी संघाची कार्यशैली सुरू आहे. विविधतेत भारताला एकत्र आणण्याची पद्धत म्हणजे संघ (ठडड), असेही भागवत यांनी रोखठोकपणे सांगितले.

**घुसखोरीबाबत व्यक्त केली चिंता**

आसाममधील लोकसंख्या बदलांबद्दलच्या चिंता दूर करण्यासाठी मोहन भागवत यांनी आत्मविश्वास, दक्षता आणि स्वतःच्या भूमी आणि ओळखीबद्दल दृढ आसक्ती बाळगण्याचे आवाहन केले. त्यांनी बेकायदेशीर स्थलांतर, हिंदूसाठी तीन मुलांचा आदर्श यासह संतुलित लोकसंख्या धोरणाची आवश्यकता आणि फुटीर धार्मिक धर्मांतरांना विरोध करण्याचे महत्त्व यासारख्या मुद्द्यांवर भाष्य केले. आपण आत्मविश्वास ठेवण्यासोबत दक्षता बाळगली पाहिजे. तसेच आपली जमीन आणि संस्कृती याच्याशी आसक्ती राखली पाहिजे असे ते म्हणाले. समाजातील सर्व घटकांनी निःस्वार्थपणे एकत्र काम केले पाहिजे, तरच या घुसखोरीला आळा बसेल, असेही ते म्हणाले.

## पूर्वीसारखे 'तारीख पे तारीख' होणार नाही : गुन्हेगार आता सुटणार नाहीत

### नवीन कायद्यामुळे शिक्षेचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत नेणार - मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

आपल्या देशात दीडशे वर्षांपासून अस्तित्वात असलेले फौजदारी कायदे हे ब्रिटिशांनी भारतीयांवर केवळ 'राज्य' करण्याच्या आणि वर्चस्व गाजवण्याच्या उद्देशाने तयार केले होते. त्या कायद्यात आपण केवळ 'प्रजा' (डील-क्षशर्ली) होतो. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणलेले नवीन कायदे हे जनतेला 'विश्वस्त' मानणारे आणि दंडापेक्षा 'न्याया'ला प्राधान्य देणारे आहेत, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पूर्वीसारखे तारीख पे तारीख आता करता येत नाही. नवीन कायद्यामुळे शिक्षेचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत नेले जाईल, असेही फडणवीस म्हणालेत

केंद्र शासनाने भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम हे नवीन फौजदारी कायदे १ जुलै २०२४



पासून देशभरात लागू केले आहे. या नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित प्रदर्शनाचे आयोजन १९ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आझाद मैदान, मुंबई येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

पूर्वीच्या राज्यात गुन्हा करुन दुसऱ्या राज्यात पळून गेलेला गुन्हेगार सापडयचा नाही. मात्र आता ते होत नाही. तसेच महाराष्ट्रातली सगळी शहरे ही सीसीटीव्हीच्या कक्षेत आली आहेत. त्यामुळे आपण लवकर आरोपीला पकडू शकतो. मेडिको लीगल केसेस मध्ये टॅम्परींग होत असे पण या सगळ्या गोष्टींच्याबाबतीत आपण मार्ग काढले आहेत. तसेच या गोष्टींमध्ये टॅम्परींग होत नाही पूर्वी इतका वेळ लागत नाही असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. पूर्वी जे तारीख पे तारीख व्हायचं ते आता करता येत नाही असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## निवडणुकांमध्ये 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग करण्याची कायद्यातच तरतूदच नाही

### निवडणूक आयोगाचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नागपूर**

राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडधे यांच्या याचिकेवर नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दाखल करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग करण्याची कायद्यातच तरतूद नाही, अशी माहिती दिली.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग व्हावा किंवा बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घेण्यात यावी, यासाठी गुडधे




यांनी याचिका दाखल केली आहे. त्यावर राज्य निवडणूक आयोगाने उपसचिव के. सूर्यकृष्णमूर्ती यांच्यामार्फत प्रतिज्ञापत्र दाखल केले. कायद्यांमध्ये तरतूद नसल्यामुळे आयोगाला स्वतःहून व्हीव्हीपॅट वापरता येणार नाही. बहुसदस्यीय मतदारसंघ असल्याने विशेष डिझाइन केलेल्या व तांत्रिक मूल्यांकन समितीद्वारे मान्यताप्राप्त ईव्हीएम आहेत. परंतु, सध्या व्हीव्हीपॅटचे मान्यताप्राप्त डिझाइन उपलब्ध नाही.

२०१७ मध्ये व्हीव्हीपॅट उपयोगाचा प्रयोग फसला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट वापरण्यासाठी कायद्यांत दुरुस्ती करावी लागेल. हा अधिकार केवळ राज्य सरकारला असून त्यांना याचिकेत प्रतिवादी करण्यात आले नाही, असेही आयोगाने सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत दिली आहे. त्यामुळे एवढ्या कमी वेळेत बॅलेट पेपरद्वारे निवडणुका घेणे अशक्य आहे.सध्या आयोगाकडे बॅलेट बॉक्स २ उपलब्ध नाहीत. परिणामी, आधी बॅलेट बॉक्सचे डिझाइन मंजूर करावे लागेल व त्यानंतर उत्पादन करून घ्यावे लागेल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर व रजनीश व्यास यांनी मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाचे प्रतिज्ञापत्र रेकॉर्डवर घेऊन या प्रकरणावर बुधवारी पुढील सुनावणी निश्चित केली.

## 'स्थानिक' निवडणुकांवर आता मंगळवारी सुनावणी

### निवडणूक प्रक्रिया जैसे थे सुरू राहणार

### एससीचे आरक्षणाची कमाल मर्यादा पाळण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेसंबंधीची सुनावणी मंगळवारपर्यंत लांबणीवर टाकली आहे. त्यामुळे सध्याची नगरपंचायत व नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया आहे तशीच सुरू राहणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य



संस्थांच्या निवडणुकीमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेविषयी निर्माण झालेल्या गोंधळामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे अनेक शहरांत आरक्षणाची ५० टक्क्यांची कमाल मर्यादा ओलांडली गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी गत सोमवारी झालेल्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला कोणत्याही स्थितीत आरक्षणाची कमाल मर्यादा पाळण्याचे निर्देश दिले होते. तसेच सध्याची निवडणूक प्रक्रिया रोखण्याचाही इशारा दिला होता. यामुळे नगरपंचायत व नगरपरिषदेच्या येत्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीवर अनिश्चिततेचे सावट पसरले होते. पण आज कोर्टाने यासंबंधीची सुनावणी मंगळवारपर्यंत लांबणीवर टाकल्याने ही निवडणूक प्रक्रिया तूर्त जैसे थे सुरू राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## नाराज एकनाथ शिंदे अमित शाहांच्या भेटीला दिल्लीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीत वादाची ठिणगी पडली असून या ठिणगीचा भडका बुधवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत पाहायला मिळाला. कारण, शिवसेना शिंदे गटाच्या सर्वच मंत्र्यांनी या बैठकीकडे पाठ फिरवली होती, त्यानंतर आपल्या मंत्र्यांसह एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपली नाराजी व्यक्त केली. त्यामध्ये, नाराजी दूर करण्यासंदर्भात दोन्ही नेत्यांकडून चर्चा झाली. मात्र, त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे आज एकनाथ शिंदे दिल्लीसाठी रवाना झाले. दिल्लीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांची दिल्लीत भेट झाली असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने चर्चा झाली.

एकनाथ शिंदे दिल्लीत पोहोचले असून



अमित शाह यांच्यासह दिल्लीतील वरिष्ठ भाजप नेत्यांची भेट घेणार आहेत. त्यानंतर, बिहार इथे जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कारण, बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी एकनाथ शिंदे यांनी बिहारमध्ये जाऊन दोन सभा घेतल्या होत्या. त्यामुळे, बिहारमधील एनडीए आघाडीच्या विजयाबद्दल अभिनंदन करण्यासाठी एकनाथ शिंदे बिहारला जाणार असल्याची माहिती आहे.

**नाराजीच्या चर्चेनंतर देवेंद्र फडणवीस-अजित पवारांची बैठक**

एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना झाल्याच कळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची वर्षा निवासस्थानी बैठक पार पडली. शिवसेना पक्षातील मंत्री आणि एकनाथ शिंदेंची वाढती नाराजी दूर कशी करायची, याबाबत दोन्ही नेत्यांच्या बैठकीत चर्चा पार पडली. एकनाथ शिंदे यांची नाराजी वाढत गेलीच तर पुढं काय करायचं याबाबतही बैठकीत चर्चा झाल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे, महायुतीतमध्ये तीन पक्षात आलबेल नसल्याचं उघड झालं आहे. दरम्यान, आमच्यात कुठलीही नाराजी नाही, कुटुंब म्हटल्यावर थोडं फार होतच असतं, असे स्पष्टीकरण शिवसेना मंत्री तथा नेते प्रताप सरनाईक यांनी नाराजीच्या चर्चांवर स्पष्टीकरण दिले होते.

## संपादकीय ......

# नाराजी नाट्याची नाट्यमय माघार

भारतीय जनता पक्ष जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष आणि सर्वाधिक सदस्य असलेला पक्ष असल्याचा दावा मोदी-शहांपासून भाजपचे सर्वच नेते करत असतात, पण या पक्षाची मोठं होण्याची भूक काही संपताना दिसत नाही. प्रत्येकालाच भाजपमध्ये प्रवेश देण्याचा सध्या महाराष्ट्रात सपाटा सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यापासून भाजपमध्ये रोजच घाऊक प्रवेश सोहळे सुरू आहेत. ज्या प्रमाणात भाजपमध्ये नेत्यांचे लोंढे येत आहेत, त्यांना बसण्यासाठी, सामावून घेण्यासाठी भाजपचे मुंबईतील कार्यालय कमी पडत आहे. त्यासाठीच भाजपच्या महाराष्ट्रातील भव्य कार्यालयाचे भूमिपूजन अमित शहांनी नुकतेच मुंबईत केले. चर्चगेट भागात तब्बल १६५५ वर्ग मीटर एवढ्या मोठ्या प्लॉटवर ५५ हजार स्क्वेअर फुटांवर १५ मजली भाजप कार्यालयाची इमारत उभी राहणार आहे. याच इमारतीच्या पायासाठी कुदळ मारल्यानंतर अमित शहांनी पक्षाला आता कुबड्यांची गरज नाही, असे सांगत त्यांच्या सोबत असलेल्या पक्षांची कबर खोदण्यास सुरुवात करण्याचे अप्रत्यक्ष आदेश दिले असल्याचे बोलले जाऊ लागले.

अमित शहांच्या आदेशाचे पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण पालन करत आहेत. आता नेतानेच सांगितले की, कुबड्यांची गरज नाही. तर राज्यातील नेत्यांनीही कुबड्या भिरकावून देण्यासाठी 'ऑपरेशन लोटस' सुरू केले. संपूर्ण राज्यात एकनाथ शिंदेंच्या आमदारांविरोधात नवे नेतृत्व भाजपकडून उभे केले जाऊ लागले. शिंदेंचे अनेक आमदार या विरोधात बोंबा मारत होते. मात्र जोपर्यंत एकनाथ शिंदे यांच्या घरात आग लागली नाही, तोपर्यंत त्यांनी याविषयी नाराजी व्यक्त केली नव्हती. मात्र कल्याण-डोंबिवलीत जेव्हा शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला, तेव्हा एकनाथ शिंदेंकडून ऑपरेशन लोटसला विरोध सुरू झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ठाण्याचे प्रभारी म्हणून गणेश नाईक यांना जबाबदारी देण्यात आली. ठाणे, कल्याण हा शिंदेंचा बालेकिल्ला रवींद्र चव्हाणांकडून खिळखिळा करण्यास सुरुवात झाली. माजी नगरसेविका सुनीता पाटील, माजी नगरसेवक महेश पाटील, माजी नगरसेविका सायली विचारे यांना भाजपत प्रवेश देण्यात आला. महेश पाटील हे कल्याण ग्रामीण शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख होते. कल्याण-डोंबिवली महायुतीचा महापौर होणार, असं रवींद्र चव्हाण म्हणत असले तरी या महायुतीत शिंदेंच्या शिवसेनेला किती स्थान असणार याचा अंदाज त्यांना निवडणुका घोषित होण्यापूर्वीच यायला लागला असणार. यामुळेच मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीवर शिंदेंच्या मंत्र्यांनी बहिष्कार टाकला.

ठाणे, कल्याण, नाशिकपासून संभाजीनगर आणि जळगावमधील पाचोर्यापर्यंत शिंदेंचे मंत्री आणि आमदारांमध्ये अस्वस्थता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील रायगड, सांगली, साताराचे आमदार आणि मंत्रीही भाजपच्या ऑपरेशन लोटसमुळे त्रस्त आहेत. काय झाडी, काय डोंगर म्हणणारे शहाजी बापू आता 'भाजप अबलेवर बलात्कार केल्यासारखं वागत' असल्याचं म्हणत आहेत. त्यांच्या या वाक्यातून शिंदेंच्या नेत्यांची सध्याची अवस्था नेमकेपणाने समोर येते. सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी शिंदेंच्या नेत्यांची परिस्थिती झाली आहे. याविरोधात ते जास्तीत जास्त काय करू शकतात, तर कॅबिनेटला गैरहजर राहून आपली नाराजी दाखवू शकतात, ते त्यांनी केले. महाविकास आघाडीत असताना अजित पवार निधी देत नाहीत म्हणून बंड करणारे शिवसेनेचे वाघ आता अबलेची भाषा करायला लागले आहेत. भाजपने कुबड्या फेकून देण्याची तयारी काही आज केलेली नाही. याची सुरुवात २०१४ पासूनच झाली आहे. भाजपचा सर्वात जुना साथीदार शिरोमणी अकाली दलाने भाजपची साथ सोडली, त्यानंतर हिंदुत्वाच्या मुद्द्यावर एकत्र आलेल्या शिवसेनेसोबतची भाजपची ३० वर्षांची युती तुटली. आता मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महापालिका भाजपच्या डोळ्यासमोर आहेत. या सर्व महापालिकांमध्ये भाजपचाच महापौर बसवायचा या दिशेनेच मंगळवारी मुंबईत संभाजीनगरमधील राजू शिंदेंची घरवापसी आणि नाशिकमधील अद्वय हिरेंचा भाजप प्रवेश झाला. भाजपची कल्याण-डोंबिवलीचीही तयारी त्याच दिशेने सुरू आहे. मुख्यमंत्र्यांकडे शिंदे आणि त्यांच्या चार-दोन मंत्र्यांनी या पक्षप्रवेशांना विरोध केला. युतीधर्माची आठवण करून देण्यात आली. रवींद्र चव्हाणांना समज देण्यास सांगण्यात आले. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून कोणता शब्द दिला गेला, हे काही समोर आले नाही. शिंदेंच्या मंत्र्यांच्या नाराजी नाट्याची नाट्यमय अखेर काही मिनिटांत झाली. बावनकुळेंकडून सर्वकाही आलबेल असल्याचं खोटंखोटं लटकेच सांगण्यात आलं. पण महापालिकांसाठी महायुती झाली तरी त्यामध्ये शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला दुय्यम स्थान घ्यावे लागणार, हे आता स्पष्ट होत आहे. अन्यथा हाती धुपाटणे उरण्याचीच शक्यता अधिक. त्यामुळे तूर्तास नाराजी दाखवण्यात आली असली तरी शिंदेंचे मंत्री आणि आमदारांना संयमानेच घ्यावे लागणार आहे. कारण बंड करण्याची ताकद आता कुबड्यांमध्ये राहिलेली नाही, हे तेही जाणून असणार.

# वन्य प्राण्यांकडून पिकांचे नुकसान झाल्यास आता पिक विमा योजनेतून मदत मिळणार




**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**
वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांनी होणारे पीक नुकसान आता प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत कव्हर केले जाणार आहे. हे नुकसान २०२६ च्या खरीप हंगामापासून मिळेल.

यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. मुसळधार पाऊस व पुरामुळे भात पिके पाण्याखाली गेल्यास झालेले नुकसानही विमा योजनेअंतर्गत कव्हर केले जाईल.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**कोण करते नुकसान?**
भारतातील शेतकऱ्यांच्या पिकांचे हत्ती, रानडुक्कर, नीलगाय, हरीण आणि माकडे यांसारख्या वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे मोठे नुकसान होते.

आता या नुकसानीला स्थानिक जोखीम श्रेणी अंतर्गत पाचवा अतिरिक्त विमा कव्हर म्हणून ओळखले जाईल. त्याचा लाखो शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल.

**या राज्यांना फायदा-** या विम्यामुळे ओडिशा, छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि उत्तराखंड यासारख्या राज्यांना फायदा होईल. शेतकऱ्यांच्या दाव्यांचा तत्काळ निपटारा होईल.

**शेतकऱ्यांना ७२ तासांत हे मात्र करावे लागणार-** राज्य सरकारांना नुकसानीसाठी जबाबदार असलेल्या वन्य प्राण्यांची यादी जाहीर करणे, तसेच आधीच्या डेटाच्या आधारे असुरक्षित जिल्हे ओळखावे लागतील.

शेतकऱ्यांना जिओटॅग केलेले छायाचित्र अपलोड करून पीक विमा ॲप वापरून ७२ तासांच्या आत नुकसान नोंदवावे लागेल, असे मंत्रालयाने म्हटले आहे. अनेक राज्यांनी या विम्याची मागणी केली होती.

**भात पिक पाण्याखाली गेल्यास-** प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत भातपिके पाण्याखाली जाण्याच्या नुकसानीसाठी स्थानिक स्वरूपातील आपत्तीपासूनचे विमा कवच पुन्हा लागू केल्याने विशेषतः किनारपट्टीलगतच्या भागातील आणि पूरप्रवण राज्यांतील शेतकऱ्यांना मोठा लाभ मिळणार आहे.

विशेषतः ओडिशा, आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र आणि उत्तराखंड या राज्यात भातपिके पाण्याखाली जाणे ही नियमित समस्या झाली आहे. अशा राज्यांतील शेतकऱ्यांना याचा सर्वाधिक लाभ मिळू शकणार आहे.

तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणाऱ्या नुकसानाचाही समावेश करण्यात आल्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजना अधिक समावेशक, प्रतिसादात्मक आणि शेतकरीस्नेही बनली आहे.




## हिवाळ्यातील आहार कसा असावा? आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक -** हिवाळा हा आरोग्यासाठी पूरक ऋतू मानला जातो. कारण या ऋतूत शरीराची पचनशक्ती चांगली असते, त्यामुळे या दिवसांत आहाराकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. शिवाय हवामान बदलामुळे संसर्गाच्या आजारांचा धोका वाढतो, त्यामुळे थंडीच्या या वातावरणात आहारात उबदार पदार्थांचा समावेश करणे गरजेचं असतं. या दिवसांत अनेक हंगामी भाज्या, फळं येतात, या भाज्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. चला तर मग जाणून घेऊया हिवाळ्यातील आहार नेमका कसा असावा?

**सूप, गरम पाणी-** पाणी हे आपल्या शरीरासाठी आवश्यक असतं. हिवाळ्यात थंड हवेमुळं पाणी पिण्याकडं दुर्लक्ष केलं जातं. मात्र त्यामुळे डिहायड्रेशनचा धोका वाढतो. त्यामुळेच या दिवसांत पुरेसे पाणी प्यावं, पण थंड पाण्याऐवजी गरम किंवा कोमट पाणी पिणे चांगलं ठरतं. तसेच संध्याकाळच्या वेळी सूप, ग्रीन टी असे शरीराला गरमपणा देणारे पदार्थ घ्यावे. टोमॅटो, व्हेजिटेबल, कडधान्याचे पौष्टिक सूप आहारात घेणं फायदेशीर ठरतं.

**हंगामी भाज्या-** हिवाळा हा ताज्या भाज्यांचा आणि पोषक आहाराचा ऋतू आहे. या दिवसांत येणाऱ्या काही हंगामी भाज्या शरीराला उब देतात आणि संसर्गापासून संरक्षण करतात. जसे की, गाजर ही भाजी जीवनसत्त्व 'ए'चा उत्कृष्ट स्रोत आहे. गाजरात फायबर, कॅल्शियम आणि अँटीऑक्सिडंट्सही असतात. त्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात. मटारमध्ये प्रोटीन, लोह, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस असतात. मटार शरीराला ऊर्जा देते आणि हाडे मजबूत ठेवते. मेथी ही हिवाळ्यातील आरोग्यवर्धक पालेभाजी आहे. मेथी रक्तशुद्ध करते, पचन सुधारते आणि मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. याशिवाय हरभरा, हुरडा हे पदार्थ देखील आहारात घ्यावेत. तसेच या दिवसांत येणारी ओली हळद देखील तुमच्या आहारात असणं गरजेचं आहे. तुम्ही त्याचं लोणचं, भाजी बनवून ती खाऊ शकता. आयुर्वेदात ओली हळद सूज कमी करण्यास, सर्दीची समस्या दूर करण्यासाठी, पाचन प्रणाली सुधारण्यासाठी, रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी, रक्ताचे शुद्धीकरण आणि कर्करोगासारख्या आजारांविरुद्ध लढण्यास प्रभावी असल्याचे म्हटलं आहे.




**हंगामी फळे-** हिवाळ्यातील हंगामी फळांचा आहारात समावेश करावा. जसे की, संत्री, मोसंबीमध्ये व्हिटॅमिन सी असतं, ज्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती सुधारते. पेरूमध्ये फोलेट, फायबर्स, विटामिन्स आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे हिवाळ्यात होणारी पोटासंबंधी समस्या दूर करण्यास मदत होते. तसेच या दिवसांत आवळा मुबलक भरपूर प्रमाणात मिळतो. यात सी जीवनसत्व मुबलक प्रमाणात असते. ज्यामुळे रोग प्रतिकारशक्ती वाढते. पचन चांगले होण्यास आणि केस आणि डोळ्याचे आरोग्य चांगले राहते, त्यामुळं आहारात आवळ्याचं लोणचे, कँडी, चुंदा, आवळारस यांसारख्या पदार्थांचा समावेश करावा.

**बाजरीची भाकरी-** हिवाळ्यात बाजरीची भाकरी ही आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. बाजरी हे अनेक पोषक तत्त्वांनी समृद्ध धान्य असते. हिवाळ्यात शरीराला ऊर्जा आणि उबदारपणाची जास्त गरज असते. यामुळे थंडीच्या दिवसात बाजरीची भाकरी खाल्ल्याने शरीराला ऊर्जा मिळते. याशिवाय बाजरीच्या भाकरीमुळे पचनक्रिया सुधारते. वजन नियंत्रित करण्यास मदत होते आणि हृदयाचे आरोग्यही सुधारते.

# अमरावती महानगरपालिकेत 'कूल रूफ' प्रकल्पावरील महत्त्वपूर्ण बैठक

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती** शहरातील वाढते तापमान, हवामानातील सतत बदल, ऊर्जेची वाढती गरज आणि नागरिकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याच पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिका 'कूल रूफ' या अभिनव प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढाकार घेत आहे. या दृष्टीने आज दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी महानगरपालिका मुख्यालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर चर्चा व प्रेझेंटेशनसह विशेष बैठक आयोजित करण्यात आली.या बैठकीत संबंधित कंपनीच्या तज्ज्ञ प्रतिनिधींनी कूल रूफ तंत्रज्ञानाची माहिती देणारा सविस्तर प्रेझेंटेशन दाखविले. या प्रेझेंटेशनमध्ये कूल रूफ म्हणजे काय व त्याचे तांत्रिक कार्यपद्धती, इमारतींवरील उष्णता परावर्तित करून तापमान कमी करण्याचे फायदे, ऊर्जा बचतीवर होणारा परिणाम, पर्यावरणीय टिकाव, शहरी उष्णता बेट कमी करण्याची क्षमता, खर्च, देखभाल आणि विविध निवास व व्यावसायिक इमारतींमध्ये अंमलबजावणीचे उपाय हे महत्त्वाचे मुद्दे समाविष्ट होते. प्रेझेंटेशनदरम्यान कंपनीच्या अधिकाऱ्यांनी इतर शहरांमध्ये हे तंत्रज्ञान कसे राबविण्यात आले आणि त्याचे सकारात्मक परिणाम काय दिसून आले याचेही उदाहरणांसह स्पष्टीकरण दिले.



बैठकीस महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कूल रूफ संकल्पनेची अमरावतीत अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी, आवश्यक साहित्य, हवामानमानानुसार लागणारी तांत्रिक मानके, नागरिकांची सहभागिता आणि अंदाजित खर्च अशा मुद्द्यांवर अधिकाऱ्यांनी प्रश्न उपस्थित करत सूचना मांडल्या.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी कूल रूफ प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, अमरावतीसारख्या वेगाने विकसित होत असलेल्या शहरात तापमान नियंत्रण ही अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. कूल रूफ तंत्रज्ञान ऊर्जाबचत, पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी नियोजनबद्ध आणि टप्प्याटप्प्याने करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. त्यांनी सार्वजनिक इमारती, शाळा, रुग्णालये, तसेच निवडक निवासी भाग येथे प्रायोगिक स्वरूपात कूल रूफ बसविण्यास प्राधान्य द्यावे, अशी सूचना दिली. तसेच नागरिकांमध्ये या तंत्रज्ञानाविषयी जागृती वाढवण्यासाठी मोहिमा राबविण्याचे निर्देशही दिले.या बैठकीत कूल रूफ प्रकल्पासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.पायलट प्रोजेक्टसाठी निवडलेल्या इमारतींची यादी, तांत्रिक तपासणी आणि अंदाजपत्रक साहित्य पुरवठा आणि गुणवत्ता तपासणी, जाहिरात, जनजागृती आणि नागरिकांचा सहभाग या सर्व बाबींवर लवकरच पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.अमरावती महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे शहरातील तापमानातील वाढ नियंत्रित होण्यास मदत मिळेल, ऊर्जा बचत वाढेल आणि पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळेल. कूल रूफ प्रकल्पाबाबत झालेली ही बैठक शहराच्या शाश्वत विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.या बैठकीत उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी सागर वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचनाकार कांचन भावे, बांधकाम विभागाचे उपअभियंता सुहास चव्हाण, श्रीरंग तायडे, आशिष अवसरे, नितीन बोबडे, विवेक देशमुख, अभियंता हेमंत महाजन तसेच अमरावती क्रेडाईचे अध्यक्ष राजन पाटील सह इतर पदाधिकारी भुषण देशपांडे, सुधीर पेठे, आर्किटेक्ट शैलेंद्र देशमुख, रोहित पुनशी, बिल्डर किंगरानी, राम महाजन, कौस्तुभ राऊत व इतर पदाधिकारी, कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जिल्हा व सत्र न्यायालय येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती,** जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आज मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश-१ तथा प्र. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. जी. वाघमारे होते. या कार्यक्रमामध्ये विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. 'ज्येष्ठ नागरिकांसाठी उपेक्षितेच्या समस्यांबाबत मार्गदर्शन' जिल्हा न्यायाधीश



यशवंत गोस्वामी यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सुनील देशमुख, जिल्हा सरकारी वकिल परिक्षित गणोरकर ज्येष्ठ नागरिक संघाचे पुरुषोत्तम गावडे, यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अँड श्रीमती प्राजक्ता वरुडकर यांनी तर आभार अँड अमित सहारकर यांनी मानले. यावेळी जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती व कामगार नेता डॉ दामोदर पवार, अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायिक अधिकारी, तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त तिवसा येथे 'युनिटी पदयात्रा' संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती-** भारताचे लोहपुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून 'मेरा युवा भारत' (युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय, भारत सरकार) यांच्यामार्फत देशभर 'सरदार१५० अभियान' अंतर्गत जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित करण्यात येत आहेत. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त ३१ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान चालणाऱ्या या अभियानाचा भाग म्हणून अमरावती जिल्ह्यात या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा येथे आज 'युनिटी पदयात्रा' (सरदार१५० पदयात्रा) आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन तिवसा येथील गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, नायब तहसिलदार आशिष नागरे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, मेरा युवा भारतच्या स्नेहल बासुतकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्वांनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली. मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवून पदयात्रेचा शुभारंभ केला. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला. ही पदयात्रा या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा येथून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पेट्रोल पंप, शहीद स्मारक मार्गे पुन्हा महाविद्यालयात येवून पदयात्रेचा समारोप करण्यात आला. या 'सरदार१५० पदयात्रे'त मेरा युवा भारत अमरावती, जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, शिक्षण विभाग, विविध शाळा-महाविद्यालये, स्थानिक युवा संघटना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १९ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण


# अमरावतीचा 'सिटी बर्ड' निवडण्याची प्रक्रिया सुरू!

## नागरिकांना मतदानाचा हक्क: आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–** अमरावती शहराच्या पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अमरावतीचा अधिकृत 'शहराचा पक्षी' (सिटी बर्ड) निवडण्याची प्रक्रिया आजपासून (१८ नोव्हेंबर) सुरू झाली असून, अमरावती करांना ऑनलाईन मतदानाद्वारे आपल्या पसंतीच्या पक्ष्याची निवड करण्याचे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

३८व्या महाराष्ट्र पक्षीप्रेमी परिषद व तिसऱ्या अखिल भारतीय पक्षिमित्र संमेलनानंतर आता या उपक्रमाला मूर्त स्वरूप येत आहे. अमरावती शहराच्या ओळखीशी सुसंगत आणि येथील पर्यावरणात सहज आढळणाऱ्या सहा पक्ष्यांची नावे 'शहराचा पक्षी' उमेदवारीसाठी जाहीर करण्यात आली आहेत.

'शहराचा पक्षी' (सिटी बर्ड) निवड प्रक्रिया आणि उमेदवार

अमरावती महानगरपालिकेने वन्यजीव व पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत असणाऱ्या 'वाइल्डलाईफ एन्व्हायर्नमेंट कन्झर्वेशन सोसायटी' च्या सहकार्याने खालील सहा पक्ष्यांची यादी अंतिम केली आहे. हे पक्षी अमरावती शहराच्या जैवविविधतेचे प्रतिनिधित्व करतात:

**१. राखी धनेश:** अमरावतीतील मोठ्या, जुन्या झाडांवर सहज दिसणारा राखी धनेश फळे खाऊन बीजप्रसार करतो. त्यामुळे त्याला जंगलाचा शेतकरी म्हणतात.

**२. तांबट :** उक्क-उक्क असा घुमणारा आवाज करणारा तांबट वड, उंबर, पिंपळ यांच्या फळांवर विशेषतः दिसतो. छोटा पण रंगीबेरंगी असा हा शहरातील परिचित पक्षी आहे.

**३. हुदहुद :** डोक्यावरील तुरा आणि वाकलेली चोच यामुळे सहज ओळखता येणारा हुदहुद मोकळ्या जागांवर दिसतो. अमरावतीच्या अनेक भागात तो सहज भेटतो.

**४. ठीपकेवाला पिंगळा :** लहान, ठिपकेदार आणि सर्वत्र आढळणारा हा पिंगळा उंदीर व सरडे खाऊन शेतीसाठी उपयुक्त ठरतो. तो जुन्या झाडांमध्ये आणि वाड्यांत आश्रय घेतो.

**५. शिक्रा :** निळसर राखाडी रंगाचा आणि नारिंगी रेषांनी उठून दिसणारा शिक्रा एक तडफदार शिकारी पक्षी आहे. शहरातही सहज दिसतो आणि अन्न साखळीतील महत्त्वाचा दुवा आहे.

**६. भारव्दाज** – लांब शेपूट, विटकरी पंख आणि लाल डोळे असलेला भारव्दाज हिरवळीत हमखास दिसतो. डोमकावळ्यासारखा दिसत असला तरी निळसर झाक त्याला वेगळेपण देते.




### मतदानाचे वेळापत्रक आणि आवाहन

या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये पक्षीसंवर्धन, जैवविविधता आणि पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी जाहीर केले की, अमरावतीकरांना मतदानासाठी खालीलप्रमाणे कालावधी देण्यात आला आहे:

**मतदान कालावधी:** १८ नोव्हेंबर २०२५ ते २८ नोव्हेंबर २०२५

**निकाल घोषणा:** ३० नोव्हेंबर २०२५

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अमरावतीकरांना आवाहन केले की, आपल्या शहराच्या पर्यावरणाचे प्रतिनिधित्व करणारा पक्षी निवडण्याची ही एक अनोखी संधी आहे. नागरिकांनी या निश्चित वेळेत जास्तीत जास्त संख्येने ऑनलाईन पोर्टलवर जाऊन आपल्या पसंतीच्या 'शहराच्या पक्षी' ला मत द्यावे आणि या ऐतिहासिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा.

**टीप:** मतदानासाठी ऑनलाईन पोर्टलची लिंक अमरावती महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि सोशल मीडिया हँडलवर आजपासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. हा उपक्रम अमरावती शहराच्या पर्यावरणपूरक प्रतिमेला नवा आयाम देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.–

# अध्यक्षपदाचे १९ तर सदस्यांचे २९५ अर्ज अवैध

## नगराध्यक्षपदासाठी १०८ तर सदस्य पदासाठी १५१६ उमेदवार रिंगणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती** जिल्ह्यातील दहा नगर परिषद व दोन नगर पंचायतच्या नगराध्यक्ष व सदस्य पदाकरीता दाखल नामनिर्दे शन पत्राच्या छाननी अंती अध्यक्ष पदाचे १९ तर सदस्य पदाचे २९५ अर्ज अवैध ठरले आहेत. आता अध्यक्षपदासाठी रिंगणात १०८ तर सदस्य पदांकरीता १५१६ अर्ज वैध ठरले आहेत.

अध्यक्ष पदाकरीता वैध अर्जाची संख्या (कंसात सदस्य पदाचे वैध अर्ज) नगर पंचायतनिहाय नांदगावखंडेश्वर ११ (७८), धारणी १३ (८८), नगरपरिषदनिहाय शेंदुरजनाघाट ६ (८७), चिखलदरा ५ (५३),पत्र वैध झाले आहे. १७ नोव्हेंबर रोजी नगरसेवक पदासाठी व १९ प्रभागाकरीता एकुण १०९ नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते. छाननी प्रक्रियेत ९९ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध झाले, तर १० उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र अवैध झाले आहे. वैध झालेल्या उमेदवारांची यादी निवडणुक निर्णय अधिकारी यांनी प्रसिध्द केली आहे. १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत नामनिर्देशन पत्र मागे घेता येणार आहे. वैधरित्या नामनिर्देशीत केलेल्या उमेदवाराची यादी प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसाच्या आत जिल्हा न्यायधिशाकडे अपील करता येणार आहे. त्याकरीता २१ ते २५ नोव्हेंबरपर्यंत अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल, त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी व २५ नोव्हेंबरपर्यंत निकाल देण्यात येणार आहे. २६ नोव्हेंबरला निवडणुक चिन्हे वाटप व अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष मतदान २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत राहणार आहे. मतमोजनी ३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.

### अध्यक्षपदाचे अवैध अर्ज

नगरपंचायत धारणी, नगर परिषद चांदूरबाजार, वरुड येथील प्रत्येकी तीन, मोर्शी व अंजनगासुर्जी येथील प्रत्येकी दोन आणि अचलपूर येथील सहा अर्ज अवैध ठरले आहेत. त्याचवेळी सदस्यपदासाठी नांदगाव खंडेश्वर (९), धारणी (४२), शेंदुरजनाघाट (७), चिखलदरा (६), चांदूरबाजार – (५), चांदूररेल्वे (१०), मोर्शी (२९), वरूड (३३), धामणगावरेल्वे (५), दर्यापूर (१२), अचलपूर (६०), अंजनगासुर्जी ७७ अर्ज अवैध ठरले आहेत.

### अंजनगावसुर्जीत सर्वाधिक ७७ अर्ज अवैध

नामनिर्देशपत्राच्या छाननीत अंजनगावसुर्जी येथील सदस्य पदाचे सर्वाधिक ७७ तर अध्यक्षपदाचे दोन अर्ज अवैध ठरविण्यात आले. अध्यक्ष व सदस्यपदाची अवैध ठरलेली अर्जसंख्या नगर परिषदनिहाय नांदगाव खंडेश्वर : सदस्य–९, धारणी अध्यक्ष ३, सदस्य ४२, शेंदुरजनाघाट सदस्य ७, चिखलदरा सदस्य ६, चांदूरबाजार अध्यक्ष ३, सदस्य ५, चांदूररेल्वे सदस्य १०, मोर्शी अध्यक्ष २, सदस्य २९, वरुड अध्यक्ष ३, सदस्य ३३, धामणगावरेल्वे सदस्य ५, दर्यापूर सदस्य १२, अचलपूर अध्यक्ष ६, सदस्य ६० अशी आहे.

# दर्यापुरात नगराध्यक्षपदासाठी जाऊबाईंची टक्कर

## निवडणुकीत रंगली चुरस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९दर्यापूर:** निवडणुका आल्या की नव नवीन किस्से बघायला मिळतात. काही ठिकाणी कुटुंबातच राजकीय चढाओढ पहायला मिळते. असेच एक उदाहरण बघायला मिळत आहे ते दर्यापूरच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत. या शहरातील एका कुटुंबातील दोन भावांच्या पत्नी म्हणजेच जाऊ–जाऊ मध्ये संघर्ष पाहायला मिळत आहे. राजकारणाने नातेसंबंधांना निवडणुकीच्या आखाड्यात आणले आहे. दर्यापूरमध्ये भाजपचे अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नी नलिनी



भारसाकळे या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार आहेत, तर काँग्रेसने प्रकाश भारसाकळेयांचे धाकटे बंधू सुधाकर भारसाकळेयांच्या पत्नी मंदाकिनी भारसाकळेयांना उमेदवारी दिली आहे. या दोन कुटुंबातील राजकीय स्पर्धा नवीन नाही.

नऊ वर्षांपुर्वी झालेल्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी भाजपतर्फे नलिनी भारसाकळे आणि काँग्रेसतर्फे त्यांचेदीर सुधाकर भारसाकळे अशीलक्षवेधी लढत झाली होती. या निवडणुकीत नलिनी भारसाकळे यांनी सुधाकर भारसाकळेयांच्यावर ६६ मतांनी निसटता विजय मिळवला. त्यावेळी आमदार प्रकाश भारसाकळे यांनी आपला गड शाबूत राखला होता. पण, आता या कुटुंबात दोन जावांमध्ये संघर्ष पहायला मिळत आहे. प्रकाश भारसाकळे यांचे बंधू सुधाकर भारसाकळे हे काँग्रेसचे नेते आहेत. ते अमरावती जिल्हा मध्यवर्तीसहकारी बँकेचे विद्यमान संचालक आहेत. प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नी नलिनी यांनी देखील राजकीय पक भुषवली आहेत. या दोन भावांच्या कुटुंबातील राजकीय संघर्ष यावेळीही लक्षवेधी ठरला आहे.

### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांचे ठाणेदारांना कारवाईचे आदेश

# सराईत गुन्हेगारावर कारवाई करा

## – पोलीस आयुक्त अरविंद चावरिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**
पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व ठाणेदारांसह शाखा प्रमुखांची बैठक घेतली. निवडणुक शांततेत आणि भयमुक्त वातावरणात व्हावी, याकरीता ठाणेदारांनी आपापल्या हद्दीतील सराईत गुन्हेगारांची यादी तयार करून त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले. यावेळी तिन्ही पोलीस उपायुक्त व सर्व ठाणेदार उपस्थीत होते.



मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर पोलीस दलाने कंबर कसली असून आतापासूनच शहरातील प्रत्येक परिसराचा आढावा घेतला जात आहे.निवडणुक भयमुक्त वातावरणात व्हावी यादीने आयुक्तालयातील प्रत्येक ठाणेदारांनी आपापल्या हद्दीतील सराईत व कुख्यात गुन्हेगारांची यादी तयार करून त्यांची माहिती घेण्यास आयुक्तांनी सांगितले. जे गुन्हेगार राजकीय नेत्यांच्या जवळचे आहेत, अशा गुन्हेगारांवर विशेष लक्ष ठेवून ते काय करतात, कोणासोबत राहतात, त्यांचा आर्थिक स्त्रोत काय आहे, अशा सर्व बाबींची पोलीस गुप्त माहिती घेत आहेत. तसेच शहरातील सर्व गुन्हेगारांच्या भूतकाळातील आणि सध्याच्या नोंदी तपासण्यापासून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे आयुक्तांनी सांगितले.


शहरातील काही महत्वाच्या ठिकाणी पोलीस बारकाईने लक्ष ठेऊन आहेत. कोणत्याही प्रकारची हालचाल आढळल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवा, असे आदेश पोलीस आयुक्तांनी बैठकीत दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन ६ डिसेंबर, सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे आगमन लक्षात घेता शहरात तगडा बंदोबस्त तैनात करावा. तसेच विशेष शाखेसह प्रत्येक ठाण्यातील खुपिया यांनी आपापल्या हद्दीत विशेष लक्ष ठेवावे आणि काही आढळल्यास तत्काळ वरिष्ठांना माहिती द्यावी, असे निदेश पोलीस आयुक्तांनी दिले.

# प्राध्यापक नियुक्तीसंदर्भात शासनाचा निर्णय रद्द करा

## शैक्षिक महासंघ घेणार राज्यपाल आचार्य देवव्रत यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**
महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रासमोर उभ्या ठाकलेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महामहीम राज्यपाल तथा कुलपती आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघातर्फे निवेदन सादर करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने प्राध्यापक नियुक्ती संदर्भात दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी केलेला निर्णय तात्काळ प्रभावाने रद्द करावा अशी भूमिका महासंघाने घेतली आहे.

हा शासन निर्णय युजीसीच्या विविध रेग्युलेशन / नियमांना प्रत्यक्ष विरोध करणारा, स्थानिक उमेदवारांना गंभीरपणे प्रतिकूल ठरणारा आणि महाराष्ट्रातील विद्यापीठ तसेच महाविद्यालयांच्या शैक्षणिक आरोग्यावर दीर्घकालीन य नकारात्मक परिणाम करणारा असल्याचे महासंघाचे मांडण्यात आले आहे. शैक्षिक मत महासंघ या संदर्भात महामहीम राज्यपालांची भेट घेण्यात येणारआहे. शासनाच्या राज्य या निर्णयातील सर्वात गंभीर बाब म्हणजे युजीसीने स्पष्टपणे ठरवलेल्या ५०:५० गुणांकन तत्त्वाला मोडीत काढून राज्याने ७५:२५ असे असमतोल व अन्यायकारक गुणांकन लागू केले आहे. हा निर्णय निवड प्रक्रियेच्या विश्वासार्हतेला धक्का देणारा असून, युजीसी रेग्युलेशन २०१८ आणि निवड प्रक्रियेशी थेट विसंगत आहे. याशिवाय विद्यापीठाच्या बॅण्डवर आधारित गुणांकन हे तत्त्वतः भेदभावकारक, असमतोल आणि स्थानिक उमेदवारांच्या संधींवर छुप्या स्वरूपात गदा आणणारे आहे.



समान पात्रता, समान परिश्रम आणि समान क्षमता असतानाही फक्त पदवी प्रदान करणाऱ्या नावामुळे विद्यापीठाच्या उमेदवारांचे गुण कमी–जास्त करणे मूलभूत ही संकल्पना शैक्षणिक न्यायाच्या तत्त्वालाच हरताळ फासणारी आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे.

तदर्थ, हंगामी किंवा तासिका तत्त्वावर अनेक वर्षे अध्यापन संशोधनातील करणाऱ्या पात्र शिक्षकांचा अनुभव ग्राह्य न मानता त्यांना भरती प्रक्रियेबाहेर ढकलणे ही राज्याच्या ज्ञान–परिसंस्थेच्या संरचनेलाच हानी पोहोचवणारी पद्धत आहे. बहु–लेखक गुणवाटपातील विसंगती, मुलाखतींची गुप्तता, गुणवत्ता यादी जाहीर करण्यात विलंब, आणि तांत्रिक अस्पष्टता या सर्व त्रुटी एकत्रितपणे भरती प्रक्रिया अधिकच संभ्रमात टाकणाऱ्या ठरत आहेत. यामुळे महाराष्ट्रातील पात्र उमेदवार मोठ्या प्रमाणात बंचित होण्याची, स्थानिक विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा विद्यापीठांमधील सहभाग घटण्याची, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीतील अडथळे वाढण्याची तसेच संपूर्ण प्रक्रिया न्यायालयीन अडचणींमध्ये अडकण्याची तीव्र शक्यता महासंघाने व्यक्त करीत राष्ट्रीय सचिव तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर यांनी निर्णय रद्द करण्यात यावा किंवा त्याची अमलबजावणी त्वरित स्थगित करण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी केली.

# वाघाने अर्धवट सोडलेली शिकारही पळविली; ट्रॅप कॅमेऱ्यात कैद

## वाघडोहाच्या जंगलात वाघाचा मुक्काम वन्यजीव व मानवी संघर्ष टाळण्यासाठी नाकाबंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९पथ्रोट** रायपूर चौऱ्यामल शेतशिवारात वाघाने एका जंगली वराहाची शिकार केल्याची घटना सोमवार, १७ नोव्हेंबरला उघडकीस आली होती. त्यावेळी उपस्थित मजुरांनी आरडाओरड केल्यामुळे वाघाने तेथून पळ काढला होता. विशेष म्हणजे वराहाचा अर्धवट सोडलेला मृतदेह सोमवारी मध्यरात्री १२ वाजता वाघाने पुन्हा पळवून नेला. हा प्रकार ट्रॅप कॅमेरात कैदा झाला आहे. त्यामुळे वाघडोह परिसरातील आसपासच्या जंगलातच वाघाचा मुक्काम असल्याचे दिसून आल्याने वन विभागाच्या टीमने वाघडोह गावात मुक्काम करून गावागावांत नाकाबंदी सुरू केली आहे.वाघडोह गावाजवळ शेत शिवारात शेतात कपाशीच्या पिकाला पाणी देत



असताना, रवी राजने या तरुणाला एक वाघ वराहाची शिकार जबड्यात धरून ओढत नेताना दिसलाहोता. रवी राजनेने आरडाओरड करताच वाघाने शिकार त्याच ठिकाणी टाकून रवी राजनेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो पळून गेल्याने त्याचा जीव वाचला. या बाबतची माहिती सरपंचांचे पती संतोष लंगोटे व पोलीस पाटील सुभाष काकड यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर वन विभागाच्या पथकाला वाघाच्या पायाचे ठसे असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी त्या ठिकाणी दोन ट्रॅप कॅमेरे लावले होते. त्यामध्ये सोमवारी रात्री वाघ हा अधर्वट सोडलेली शिकार घेऊन जात असतानादिसून आला. परिणामी, वाघडोह, जनुणा, डोलार, चौऱ्यामल, गोंडवाघोली, धाडी, खोडगांव या गावांतील ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत दिनेश वाळके (वनपरिक्षेत्र अधिकारी) , सुधीर हाते (क्षेत्र सहाय्यक), वनरक्षक ए.पी. मुंडे, सैय्यद आफताब, आर. आर. बैस, व्ही. एस. शेरेकर, पी. आर. वानखडे, जे. टी. भारती, ए. वी. गायकवाड, ए. आर. शिरसाम व एस.पी. चौधरी हे वन विभागाचे अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

ट्रॅप कॅमेऱ्यात वाघ असल्याचे दिसून येत असल्याने पुढे वन्यजीव प्राण्यांसोबत मानवी संघर्ष होऊ नये, याकरिता नाकाबंदी व गावागावात मुनादी देऊन लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**दिनेश वाळके,** वनपरिक्षेत्र अधिकारी, परतवाडा

# कोण म्हणते राजकारणात घराणेशाही नाही?

## तीन आमदारांचे निकटवर्तीय निवडणुकीच्या रिंगणात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीचे चित्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत तीन आमदारांचे निकटवर्तीय नगराध्यक्षपदासाठी रिंगणात उतरले आहेत. महायुतीमधील सर्व घटक पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहेत, तर महाविकास आघाडी नऊ ठिकाणी एकमेकांविरोधात उभी ठाकली आहे. दर्यापूरमध्ये अकोटचे भाजप आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नी नलिनी भारसाकळे, धामणगाव रेल्वे येथे भाजप आमदार प्रताप अडसड यांच्या भगिनी अर्चना रोठे आणि अंजनगाव सुर्जी येथे शिवसेना (उबाठा) आमदार गजानन लवटे यांचे पुत्र यश लवटे हे नगराध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी दाखल झालेल्या अर्जांची छाननी मंगळवारी (१८ नोव्हेंबर) करण्यात आली. यावेळी अनेक अर्ज रद्द करण्यात आले. राजकीय पक्षांनी अनेकांना उमेदवारीचे आश्वासन दिले होते, परंतु ऐनवेळी केवळ एकाच उमेदवाराला 'एबी' फॉर्म दिल्याने, पक्षाच्या नावाचा उल्लेख असूनही 'एबी' फॉर्म जोडला नसल्यामुळे अनेक अर्ज बाद झाले.जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि २ नगरपंचायतींमधील नगराध्यक्षपदासाठी एकूण १२७ जणांनी दावेदारी केली होती. तर, सर्व नगरपालिकांमधून निवडल्या जाणाऱ्या २७८ नगरसेवक पदांसाठी १,८२१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. सुरुवातीला महाविकास आघाडी आणि महायुती एकत्र लढण्याची चर्चा होती. मात्र, प्रत्यक्षात महायुतीमधील प्रत्येक पक्ष सर्व ठिकाणी स्वतंत्रपणे निवडणूक लढवत आहे.



महाविकास आघाडीमध्ये तीन ठिकाणी समन्वय साधला गेला आहे. मोर्शी, वरुड आणि शेंदुरजनाघाट या तीन ठिकाणी त्यांनी युती कायम ठेवली आहे. मोर्शीत काँग्रेसच्या उमेदवाराला शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा आहे. शेंदुरजनाघाट येथे शिवसेनेच्या उमेदवाराला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने समर्थन दिले आहे, तर वरुडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला काँग्रेस आणि शिवसेनेने जाहीर पाठिंबा दिला आहे.

उर्वरित नऊ ठिकाणी महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. इतर ठिकाणांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसला मदत करण्याचे ठरवले आहे. तसेच, १२ पैकी पाच ठिकाणी शिवसेनेने मैत्रीपूर्ण लढत कायम ठेवली आहे.

# दुधाळ गाई, म्हशी खरेदीसाठी आता ७५ टक्के अनुदान

## दुग्ध विकास प्रकल्प; शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

विदर्भासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे आणि दुग्ध व्यवसायाला गती मिळावी. या उद्देशाने राज्य सरकारने विदर्भ- मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यास सुरुवात केली आहे.

उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या दुधाळ गायी-म्हशींचे ५० टक्के अनुदानावर वाटप, आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे गाभण कालवडींचे ७५ टक्के अनुदानावर वाटप ही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. याशिवाय, कडबा कुट्टी यंत्रांसाठी ५० टक्के अनुदान, पशुखाद्य आणि फॅट वर्धक खाद्यासाठी २५ टक्के अनुदान, शंभर टक्के अनुदानावर वैरण बियाणे पुरवणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पशुपालक, शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात आल्याचे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाने सांगितले आहे. शेतकऱ्यांना मुरघास निर्मितीसाठी प्रति किलो ३ रुपये अनुदान मिळणार असून, दुधाच्या विक्रीसाठी मराठवाडा दूध उत्पादक कंपनीशी करार केला आहे. जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत वैरण विकास कार्यक्रम राबवण्यात येत असून, या अंतर्गत प्रति व्यक्ती ४ हजारांचे वैरण बियाणे १०० टक्के अनुदानावर प्राप्त होत आहे. यासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरु असून, पशुपालकांनी पशुवैद्यकीय चिकित्सालयात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पशुपालकांनी या सर्व योजनांसाठी ींववा.िलो या संकेतस्थळावर नोंदणी करावी किंवा अधिक माहितीसाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा उपायुक्त डॉ. संजय कावरे यांनी केले आहे, अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवण्यात आली आहे. आधार कार्ड, सात बारा, भारत पशुधन प्रणालीवरील नोंदणीकृत जनावरांचे टैग क्रमांक, बँकेचे खाते पुस्तक, ई. व तदअनुषंगीक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. प्रकल्पाविषयी तसेच, ऑनलाइन अर्ज करण्यासाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी पशुपालकांनी संपर्क करावा.

# आकाशवाणी निवेदकाचा दुर्देवी अपघाती मृत्यू

### चांदूरबाजार मार्गावर कुरळपूर्णाजवळ कार झाडावर धडकली






**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९कुरळपूर्णा**

अचलपूरवरुन चांदूर बाजारमार्गे अमरावतीला येत असलेल्या एका ५२ वर्षीय निवेदकाचा कार अपघातात मृत्यू झाला आहे. हा अपघात अचलपूर ते चांदूर बाजार मार्गावरील कुरळपूर्णा येथील पॉवर हाऊससमोर सोमवारी १७ नोव्हेंबरला उशिरा रात्री एक वाजताच्या सुमारास झाला आहे. ममेश मनोहरराव माथनकर (५२, रा. धामणगाव गढी ता. अचलपूर, ह. मु. जयअंबे अपार्टमेंट, नवसारी, अमरावती.) असे मृत निवेदकांचे नाव आहे. ममेश माथनकर हे अमरावती आकाशवाणी येथे निवेदक म्हणून कार्यरत होते. तसेच उत्कृष्ट सूत्र संचालकसुद्धा होते. माथनकर यांचे मुळ गाव असलेले धामणगाव गढी येथे ते कारने गेले होते. दरम्यान सोमवारी उशिरा रात्री ते आशिष आगरकर यांच्यासह कारने धामणगाव गढी येथून अमरावतीला परत येत होते. अचलपूरवरुन चांदूर बाजार मार्गाने येताना कुरळपूर्णा येथील पॉवर हाऊससमोर माथनकर यांची कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला जावून धडकली. या वेळी माथनकर हे चालकाच्या बाजूच्या सीटवर बसले होते. ही धडक इतकी भीषण होती कि, माथनकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्यांना गंभीर अवस्थेत चांदूर बाजारच्या शासकिय रुग्णालयात व तेथून उपचारासाठी अमरावतीत पाठवण्यात आले, मात्र उपचारादरम्यान काही वेळातच त्यांचा मृत्यू झाला.

# देऊरवाडा परिसरात संत्रा चोरटे सक्रिय

## एका आठवड्यात सहा मोठ्या चोरीच्या घटना; लाखोंचा मुद्देमाल गायब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९करजगाव-**

करजगाव शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देऊरवाडा शिवारात संत्रा चोरीच्या सलग सहा घटनांनी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पहिल्या घटनेत झाडावरील तब्बल एक लाख रुपयांच्या संत्र्यांची चोरी झाली होती. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत दोन आरोपीना अटक केली असून त्यांना १७ नोव्हेंबरपर्यंत पीसीआर मिळाला होता.

त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच देऊरवाडा परिसरातील शेतीमधून झालेल्या दुसऱ्या घटनेत अंदाजे तीन लाख रुपयांचे संत्रे अज्ञात चोरट्यांनी पळवले. या दोन्ही घटनांमुळे मोठ्याप्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून शेतकरी संतप्त झाले आहेत. शेतकरी श्याम प्रल्हादराव काळबांडे यांच्या २००० झाडांच्या संत्राबागेतून १४ नोव्हेंबरच्या रात्री चोरी झाली. चोरांनी झाडावरून संत्रे तोडून काढून नेल्याचे शेतकऱ्यांच्या निदर्शनास आले. तपासादरम्यान पोलिसानी दोन आरोपींना अटक केली व पुढील चौकशी प्रगतीपथावर आहे. या घटनेत अंदाजे ३२ हजार संत्र्यांचे (१०० कॅरेट) एवढे मोठे नुकसानझाले. अंदाजे १ लाख रुपये किमतीचे संत्रे नेले गेल्याचे समोर आले आहे.



ताज्या गुन्हे अहवालानुसार, देऊरवाडा मौजेमधील वासुदेव विश्वासराव पाटील (७३, रा. शिरजगाव कसबा) यांच्या ८एकर शेतीत ११०० झाडे असून येथून १२ नोव्हेंबरच्या रात्री रुपये किमतीची संत्री अज्ञात सुमारे ३ लाख चोरट्यांनी चोरून नेली. ही संत्रे झाडांवर पूर्णपणे पिकलेली असल्याने चोरट्यांनी संधी साधून मोठ्याप्रमाणात तोडणी करून चोरी केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी फिर्यादीच्या जबानीवरून शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात क: ३७९ भादंविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही घटनांमध्ये मिळून ४ लाखांपेक्षा जास्त मूल्याची संत्री चोरट्यांनी लंपास केल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. संत्रा हंगाम सुरू असताना अशा चोरीच्या घटनांनी शेतकऱ्यांमध्ये भीती वाढली आहे. संत्रा हंगाम सुरू असताना सलग दोन मोठ्या चोरीच्या घटना घडल्याने शेतकरी भयभीत असून चोरी रोखण्यासाठी अधिक कडक गस्त व तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# कोल्हापुरी बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटा व अप्पर वर्धातील पाईप चोरी प्रकरण उघड

## मोर्शी पोलिसांची दोन चोरट्यांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मोर्शी-** मोर्शी तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून लोखंडी साहित्य चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना मोर्शी पोलिसांनी अटक करून ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे.०३ सप्टेंबर २०२५ रोजी ग्राम मनिमपूर शेतशिवारातील शासकीय कोल्हापुरी बंधाऱ्यावरील ०७ नग लोखंडी प्लेटा चोरीला गेल्याची फिर्याद नोंद झाल्यावरून पोलीस स्टेशन मोर्शी येथे अप. क्र. ४९७/ २०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.तसेच दिनांक १२ जुलै २०२५ रोजी अप्पर वर्धा पाटबंधारे उपविभाग, मोर्शी यांच्या वसाहतीतून लोखंडी पाईप व इतर साहित्य चोरीला गेले होते. या प्रकरणी अप. क्र. ३७२/ २०२५ कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.दोन्ही गुन्ह्यांचा समांतर तपास करत असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाला गोपनीय माहिती मिळाल्याने आरोपी राधेश्याम उर्फ ज्ञानेश्वर मोहन धुर्वे (वय ४०, रा. गधेघाटपुरा, मोर्शी) याच्या घरावर दोन पंचासमक्ष झडती घेण्यात आली. त्यावेळी लाकडाखाली लपवलेली कोल्हापुरी बंधाऱ्याची चोरीस गेलेली ०७ लोखंडी प्लेटा आढळून आल्या.विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने आपल्या साथीदारासह-चरणदास भिमराव गाडे (वय ३८, रा. गाडगेनगर, मोर्शी)-मनिमपूर येथून प्लेटा चोरल्याची कबुली दिली.पोलिसांनी या दोन्ही गुन्ह्यांतील एकूण ४६,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



# आदिवासी उमेदवारांना विनामूल्य स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाची संधी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९ अमरावती-** आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, केंद्र, अचलपूर कॅम्प, परतवाडा येथे विविध शासकीय सकीय स्पर्धा परीक्षांसाठी आदिवासी उमेदवारांना विनामूल्य पूर्व-प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या सत्राचा प्रशिक्षण कालावधी १ डिसेंबर ते १५ मार्च असा साडेतीन महिन्यांचा आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना दरमहा हजार रुपये विद्यावेतनही देण्यात येणार आहे.

प्रशिक्षणात गणित, इंग्लिश, सामान्य ज्ञान व बुद्धिमत्ता चाचणी या चार विषयांचे मार्गदर्शन केले जाईल.उमेदवार अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील असावा. वय १८ ते ३० वर्षांदरम्यान असावे.किमान एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण असावा. उमेदवाराचे नाव जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कार्यालयात नोंदणीकृत असावे. जमातीच्या उमेदवारांनी आपले अर्ज इच्छुक व पात्र अनुसूचित आवश्यक कागदपत्रांसह २४ नोव्हेंबरपर्यंत आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, अचलपूर कॅम्प, परतवाडा कार्यालयात सादर करावे.

# तंत्रनिकेतनजवळचा कचरा डेपो हटवण्याची विद्यार्थ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९अमरावती**

३शहरातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाजवळील कचरा डेपो हा परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि विद्यार्थ्यांसाठी मोठा त्रासदायक मुद्दा बनला आहे. महाविद्यालयाच्या भिंतीलगत मुख्य रस्त्यावरच मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने परिसरात दुर्गंधी, घाण, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढत असून आरोग्य धोक्यात येऊ लागले आहे.

दररोज सकाळ-संध्याकाळ कचरा गाड्यांची सततची वर्दळ सुरू असल्याने परिसर दूषित वातावरणाने व्यापलेला असतो. या मुख्य रस्त्यावरून दरदिवशी शेकडो विद्यार्थ्यांची ये-जा होत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. तसेच, मुख्य प्रवेशद्वाराजवळच कचऱ्याचे ढीग, कुजलेली भाजीपाला, हॉटेलमधील उष्टा अन्नकचरा मिसळल्याने दुर्गंधीचा त्रास वाढत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.



गाडगे नगर परिसरातील नागरिकांनी अनेकदा महापालिकेकडे तक्रारी दाखल करूनही कचरा डेपो हटविण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. शैक्षणिक संस्था आणि कचरा डेपो एकत्र राहू शकत नसल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि आरोग्य दोन्ही धोक्यात येत असल्याचे स्थानिकांचे मत आहे.विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिकांनी महापालिका प्रशासनाला आवाहन केले आहे की, महाविद्यालय परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी कचरा डेपो तातडीने इतर ठिकाणी हलविण्यात यावा. वाढत्या समस्येमुळे हा मुद्दा आता तातडीच्या उपाययोजनेची मागणी करीत आहे.

# २१ ते २३ नोव्हेंबर श्री अंबादेवी संगीत समारोह


**विदर्भ प्रजासत्ताक दि १९ अमरावती**



यावर्षीचा श्री अंबादेवी संगीत समारोह २१ ते २३ नोव्हेंबर २५ दरम्यान आयोजित करण्यात येत आहे. शुक्रवार २१ नोव्हेंबरला सायं. ६.३० वा. पं रघुनंदन पणशीकर, पुणे यांचेशास्त्रीय, उपशास्त्रीय गायन होईल. दुसऱ्या सभेत रात्री ८.३० वा सुश्री रागेश्री दास कोलकता यांचे उपशास्त्रीय गायन त्यात दादरा, ठुमरी, कजरी गायनप्रकार सादर करतील.शनिवार २२ नोव्हेंबरला सायं. ६.३० वा धारवाड येथील पं कुमार मरडूर यांचे शास्त्रीय उपशास्त्रीय गायन होईल. तर रात्री ८.३० आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सतारवादक पं पूर्बयान चॅटर्जी यांचे सतारवादन होईल. त्यांना. तबला संगत श्री ओजसअढिया, हे करतील. रविवार २३ नोव्हेंबरला सायं. ६.३० वा. स-श्री रंजनी व गायत्री चेन्नई, जुळ्या भगिनींचे शास्त्रीय गायन होईल. समारोपीय सत्रात कोलकता येथील सुप्रसिद्ध तबलावादक पं अनिंदो चॅटर्जी व त्यांचे सुपुत्र श्री अनुव्रता चॅटर्जी यांचे तबला सहवादन होईल.अंबागेटजवळील श्री अंबादेवी कीर्तन सभागृहात आयोजित या निशुल्क समारोहात रसिकांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन श्री अंबादेवी संस्थान विश्वस्त मंडळाने केली आहे.

# CET परीक्षा वर्षातून ३ वेळा होणार

## महाराष्ट्रात CET वर्षातून दोनदा व नंतर तीनदा घेण्याचा निर्णय एप्रिल, मे आणि डिसेंबर २०२६ मध्ये उएढ परीक्षा होणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

JEE - MAIN च्या धर्तीवर महाराष्ट्रात दोनदा सीईटी घेण्याचा निर्णय चांगला असून, विद्यार्थ्यांना एक वाढीव संधी मिळण्याबरोबरच गुणात्मक वाढ करता येणार आहे. तसेच, २०२६ मध्ये एप्रिल, मे महिन्यात आणि डिसेंबर महिन्यात अशी तीनदा सीईटी परीक्षा होणार आहे. त्यामुळे पुढील वर्षी सीईटीचा ट्रिपल धमाका होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आगामी शैक्षणिक वर्षात पीसीएम, पीसीबी व एमबीए या तीन अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा (उएढ) दोन वेळा घेण्यात येणार आहे. या टप्प्यातील पहिली प्रवेश परीक्षा एप्रिल-२०२६ मध्ये, तर दुसरी प्रवेश परीक्षा मे २०२६ मध्ये घेण्यात येणार आहेत. त्या माध्यमातून २०२६ चे प्रवेश होतील.

डिसेंबर २०२६ मध्ये घेण्यात येणारी तिसरी सीईटी परीक्षा आणि एप्रिल २०२७ मध्ये घेण्यात येणारी परीक्षा या माध्यमातून २०२७ मधील प्रवेश राबविले जाणार आहेत. पीसीएम, पीसीबी व एमबीए या तीन अभ्यासक्रमांसाठी या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. विद्यार्थी दशेत परीक्षा देत असताना अनेकवेळा अपयश येत. त्यामुळे त्यांना आणखी एक संधी मिळणे गरजेचे असते.

JEE-MAIN वर्षातून दोनदा होत असल्यामुळे सीईटी देखील दोनदा घेण्याची मागणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात उएढ सेलकडे गेल्या अनेक वर्षांपासून केली होती. हा एक सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्याला एक प्रवेश परीक्षा देणे बंधनकारक असून, दुसरी प्रवेश परीक्षा ऐच्छिक असेल. जर विद्यार्थ्याने दोन प्रवेश परीक्षा दिल्या, तर त्याला दोन्हींपैकी ज्यामध्ये जास्त गुण असतील त्या प्रवेशासाठी गृहीत धरले जातील. यातून विद्यार्थ्यांना तणावमुक्त परीक्षा देता येणार आहे.

# अंजनगांव सुर्जी निवडणुक कार्यात मदतीसाठी कंत्राटदारांना ओळख पत्रे

## गळ्यात ओळख पत्रे टाकून मिरवणारे कंत्राटदार राजकीय संबंधित निर्भय व नि:पक्षपणेवर बोलणाऱ्या निवडणूक यंत्रणेवर प्रश्न उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपालिका निवडणूकीचा कार्यक्रम सुरू झाला आला असून, या निवडणुकीदरम्यान आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्याबरोबर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी निवडणुकीसाठी नियुक्त सर्व यंत्रणांनी दक्षपणे काम करावे. तसेच निवडणुका निर्भय व नि:पक्षपणे पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय राखून काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले असताना अंजनगाव नगरपालिका निवडणुकीत कार्यात एक धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे.नगरपालिका निवडणुकीत प्रशासन व्यस्त असून निवडणुकीला वेळेवर लागणाऱ्या वस्तू पासून ते जेवणा पर्यंत सर्व प्रशासनाने सुविधा उपलब्ध करून




घेतल्या आहेत. अधिकारी कर्मचारी सकाळी आठ वाजल्यापासून ते रात्री अकरा बारा वाजेपर्यंत निवडणूकीचे कामकाजातील कर्तव्य बजावत आहे. निवडणूकीचे कामकाज करत असताना जेवणाचे डबे, चहा व इतर स्टेशनरी साहित्यांची गरज भासत असल्याने पुरवठा धारकांना कार्यालयात यावे लागत आहे. नगरपालिका परिसर सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणेने घेरला असून निवडणूक परिसरात प्रवेश करणाऱ्यांना पुरवठा धारकांना ओळख पत्रे देण्यात आली. याच संधीचा फायदा राजकीय संबंधित कंत्राटदारांनी काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून कार्यालयात जाण्यासाठी ओळख पत्रे तयार करून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कचरा साफ करणारा एक त्यासोबत कचरा साफ न करणाऱ्यांच्या गळ्यात ओळख पत्रे असे अनेक ओळख पत्र्याचे वाटप करण्यात आले. ते ओळख पत्रे कोणी दिले? बहुसंख्येच्या प्रमाणात कसे दिले ? ओळख पत्रे गळ्यात घालून सतत कार्यालयात फिरत आहे त्यांचा हेतू काय ?बहुसंख्येने ओळख पत्रे देण्याचे कारण काय ? कोटी रुपयांचा कंत्राट घेणारा कंत्राटदार कार्यालयात साफसफाई करु शकते का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होत असुन जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूका निर्भय व नि:पक्षपणे होणार असल्याचे निर्देश दिले असताना गंभीर प्रकार अंजनगाव सुर्जी नगरपालिका निवडणुक कार्यात घडला असल्याने निवडणूक यंत्रणेवर प्रश्न उपस्थित होत आहे.

**कोणत्याही मर्जीतल्या कंत्रातदारांना ओळखपत्र वाटप करण्यात आलेली नाही**

ते ओळखपत्र फक्त आत मध्ये जे लोकांचे साफसफाई साहित्य वाटप विविध काम आहे त्यांना तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आली होती पोलिसांनी अडवू नये म्हणून. अशी माहिती विजय लोहकरेमुख्याधिकारी तथा निवडणूक अधिकारी अंजनगाव सुर्जी यांनी दिली.

**कंत्राटदारांना अधिकारी मॅनेज**

अंजनगाव नगरसेवक पदासाठी बहुतांश कंत्राटदार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत त्यातील नगरपरिषद अंतर्गत कामे करत असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. तर काही कंत्राटदारांनी आपल्या मर्जीतील उमेदवार उभे केले असून सामदाम दंडाने कंत्राटदार उमेदवारांच्या पाठीशी आहे. चार वर्ष प्रशासकाळ असताना कंत्राटदारांनी नगरपरिषद कार्यालयातील कामकाजात हस्तक्षेप करत असल्याचा आरोप होत आहे. तर नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी कर्मचारी कंत्राटदाराच्या सोईचे काम करत असल्याची ओरड होत असताना निवडणुक दरम्यान कंत्राटदारांना ओळख पत्रे देऊन आचारसंहिता नियमांचा भंग केल्याचे दिसून येते आहे.

# देवस्थानांच्या हजारो एकर जमीन हडपप्रकरणी कठोर अँटी लॅन्ड ग्रॅबिंग ॲक्ट लागू करावा

## देवस्थानांच्या जमिनी बळकावणीप्रकरणी कठोर कायद्याची मागणी - विश्वस्तांकडून तहसीलदारांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९तिवसा**

तिवसा तालुक्यातील विविध देवस्थानांच्या विश्वस्तांनी आज दिनांक १८ नोव्हेंबर रोजी नायब तहसीलदार नरेंद्र कुरळकर यांना एक महत्त्वपूर्ण निवेदन देऊन देवस्थानांच्या हजारो एकर जमिनी भूमाफियांनी बेकायदेशीररीत्या हडपल्याबद्दल चिंता व्यक्त केली. या गंभीर भूमिगत भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी गुजरात व कर्नाटकप्रमाणे महाराष्ट्रातही तात्काळ कठोर 'अँटी लॅन्ड ग्रॅबिंग क्ट' लागू करून, देवस्थानांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली.देवस्थानांच्या इनाम जमिनी कायदेशीररित्या अहस्तांतरणीय असतानाही महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात जमीन हडपली जात आहे. इनाम रजिस्टरमध्ये फेरफार, नावे वगळणे, अतिक्रमणे आणि अवैध हस्तांतरणाचे प्रकार वाढत असून धार्मिक संस्थांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी आहे.गुजरात, कर्नाटकप्रमाणे



महाराष्ट्रातही जमीन हडपणे हा अजामीनपात्र फौजदारी गुन्हा घोषित करणारा कठोर अँटी लॅन्ड ग्रॅबिंग क्ट तातडीने लागू करावा, अशी विश्वस्तांची मागणी आहे. तसेच मागील २०-२५ वर्षांतील सर्व देवस्थान जमीन हस्तांतरण प्रकरणांची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (डखढ) स्थापन करण्याचीही विनंती करण्यात आली.देवस्थानांच्या वादग्रस्त जमिनींचे खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहू नयेत म्हणून प्रत्येक विभागात विशेष जलदगती न्यायालये सुरू करण्याची मागणीही करण्यात आली. राज्य सरकारने देवस्थान जमिनींच्या व्यवहारांवर तात्पुरती बंदी घालून सकारात्मक भूमिका घेतली असली, तरी भूमाफियांचा वाढता विस्तार रोखण्यासाठी कठोर आणि सक्षम कायदा हा काळाची गरज असल्याचे विश्वस्तांनी अधोरेखित केले.या निवेदनावेळी नागेश्वर महादेव संस्थान, गजानन महाराज संस्थान, श्री संत सोटागीर महाराज संस्थान यांसह विविध देवस्थानांचे अध्यक्ष कैलासकुमार पनपालिया, विजयराव करडे, मोहनराव इंगळे, धीरज चांडक, रवींद्र भोयर, मनोहरराव कसर, सोपान करडे, अनिल मापले, मंगेश जगताप, सुदाम श्रीखंडकर, देवराव हिरूळकर, दादाराव मानमोडे, अनिल काळमेघ, दत्ताजी माळोदे आदी विश्वस्त उपस्थित होते.

# पालिका निवडणुकीच्या तोंडावर हॉटेल-ढाबे फुल्ल

## हॉटेल व्यावसायिकांची चांदी चहाचा व्यवसायही तेजीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ मोर्शी**

कोणत्याही निवडणुकीची घोषणा होताच राजकीय पक्षांसोबतच स्थानिक आदरातिथ्य क्षेत्रातही लगबग वाढते. सध्या पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हेच चित्र अमरावती शहर आणि ग्रामीण परिसरात दिसत आहे. प्रचारासाठी आलेले नेते, कार्यकर्ते आणि प्रचार व्यवस्थापनाच्या टीम्समुळे शहरातील तसेच महामार्गालगत असलेली हॉटेल्स आणि ढाबे अक्षरशः फुल्ल क्षमतेने भरलेले आहेत.

चहाच्या टपऱ्यांवरही सकाळपासून रात्री उशिरापर्यंत गर्दी पाहायला मिळत आहे. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष आपल्या प्रमुख नेत्यांसह बाहेरून येणाऱ्या निरीक्षक, रणनीतिकार आणि कार्यकर्त्यांसाठी अनेक दिवसांची निवासव्यवस्था करतात. स्थानिक हॉटेल्स, लॉज आणि रिसॉर्टस यामध्ये मोठ्या प्रमाणावर बुकिंग घेतले जात असल्याने जवळपास संपली आहे.आचारसंहिता लागू झाल्यानंतर उमेदवारांना सरकारी विश्रामगृहे किंवा अतिथीगृहे वापरता न आल्याने खासगी हॉटेल्सच पर्याय उरतो. त्यामुळे हॉटेल रूम्सची मागणी अचानक वाढली असून या हंगामात हॉटेल व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य आहे.दुसरीकडे, रात्री उशिरा सभा, प्रचारफेऱ्या आणि रॅल्या होत असल्याने १० नंतर भोजनाची सोय करणे ही कार्यकर्त्यांची मोठी गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर महामार्गावरील ढाबे आणिस्थानिक रेस्टॉरंट्स रात्री उशिरापर्यंत सुरू राहून मोठ्या प्रमाणात ग्राहकांना सेवा देत आहेत. त्यामुळे ढाबा व्यवसायालाही चांगले दिवस आले असून उलाढाल लक्षणीयरीत्या वाढली आहे. एकूणच, या निवडणूक हंगामात राजकीय ज्वर वाढताना आदरातिथ्य क्षेत्रात 'सीझन' सुरू झाल्याचं स्पष्टपणे जाणवत आहे. हॉटेल्स, उपहारगृहे, ढाबे आणि बारमधील वाढती गर्दी त्याची साक्ष देत आहे.

# न.प. निवडणुकीत 'आप' ची भाकप, माकप, प्रहार, स्वा.शे. संघटना, जनता दल सोबत युती

## पत्रकार परिषदेतून दिली माहिती : अमरावती जिल्ह्यात चांदूर रेल्वेत 'आप' च्या एकमेव नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९चांदूर रेल्वे**

अमरावती जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर अनेक पक्षांनी उमेदवार जरी दिले असले, तरी केवळ चांदूर रेल्वे नगर परिषदेसाठी आम आदमी पार्टीने औपचारिकरीत्या निवडणुकीच्या मैदानात उतरून विकासाचा पर्याय जनतेसमोर उभा केला आहे. या निवडणुकीत 'आप' ने भाकप, माकप, प्रहार, स्व. डॉ. पांडूरंग ढोले विचारमंच, स्वा. शेतकरी संघटना, जनता दल (से.) यांच्यासोबत युती केल्याची माहिती पत्रकार परिषदच्या माध्यमातून सदर पक्ष, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी (ता. १८) सायंकाळी दिली. हे सर्व पक्ष मिळून एक जनशक्ती तयार झाली आहे. राष्ट्रीय स्तरावर दिल्ली व पंजाबमधील शासन अनुभवातून घडलेल्या मॉडेलवर आधारित, पारदर्शकता व लोककेंद्रित धोरणे चांदूर रेल्वेत लागू करण्याचा संकल्प आम आदमी पक्षाने या निवडणुकीत मांडला आहे.

आम आदमी पक्षाच्या बदल घडवण्याच्या घोषणेला विविध सामाजिक-राजकीय संघटनांचा ठोस पाठिंबा मिळाला आहे. यात भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, स्वर्गीय डॉ. पांडुरंग ढोले विचार मंच, स्वाभिमानी शेतकरी संघटना, प्रहार जनशक्ती पक्ष व जनता दल (से.) यांनी आपला पाठिंबा घोषित केला असुन हा पाठिंबा मिळणे म्हणजे चांदूर रेल्वेतील असंतोष आणि बदलाच्या अपेक्षा एकाच व्यासपीठावर एकवटल्याचे स्पष्ट संकेत आहेत.पत्रकार परिषदेत माहिती देतांना आप नेते नितीन

### गरिब कुटुंबातील, सर्वसामान्य उमेदवारांना प्राधान्य

स्थानिक सत्ताधारी पक्ष धनदांडगे उमेदवार शोधत असतांना, आमचे सर्व उमेदवार गरिब, सर्वसामान्य, श्रमिक आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील असल्याचे सांगण्यात आले. पक्षाने जात, धर्म किंवा पैशाकडे लक्ष न देता सेवाभाव, प्रामाणिकता आणि भ्रष्टाचाराविरोधातील कटिबद्धता यावर आधारित निवड उमेदवार केली आहे. या निवडणुकीत चांदूर रेल्वेकरांसाठी धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी लढत निर्माण झाली असल्याचे आप नेते नितीन गवळी यांनी स्पष्ट केले.

गवळी, भाकप नेते सतिश चौधरी, आपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार नम्रता गवळी यांनी सांगितले की, चांदूर रेल्वेतील नागरिकांना भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून आम्ही निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. हे प्रश्न केवळ आश्वासनांपुरते न ठेवता, व्यावहारिक मार्गदर्शक तत्त्वांसह मांडले जात आहेत. यात शिक्षण, आरोग्य, महिलांची सुरक्षा, शुद्ध पाणी व्यवस्था, क्रीडांगणे व गार्डन, शहर विकासाची दुरावस्था व इतर मुद्द्यांचा समावेश आहे. तयेच आम आदमी पार्टीतर्फे १४ उमेदवार, तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडून २ उमेदवार अशा एकूण १६ उमेदवारांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. यात नगराध्यक्षपदाकरिता नम्रता नितीन गवळी (आप) तर सदस्यांकरिता संगीता नरेश झंझाड, पायल गणेश पांडव, किरण विनोद लहाने, प्रशांत ज्ञानेश्वर गावंडे, ललिता श्रीधर थोरात, महेमूद हुसेन मोहम्मद हुसेन, नितीन विष्णुआप्पा गवळी, ममता निलेश होले, सुर्यकांत ज्ञानेश्वर गुडधे, शमा परवीन बादर खाँ, आशा प्रवीण मर्सकोले, अर्चना गणेश होले, सागर श्रीकृष्ण पटले, सुमेद बाबाराव सरदार, सविता अशोकराव मसतकर, चेतन मारोतराव भोले यांचा समावेश आहे. आपचे उमेदवार पक्षाच्या झाडू चिन्हावर तर भाकपचे उमेदवार पक्षाच्या विळा ओंबी या चिन्हावर निवडणुक लढविणार आहे. या यादीत आपच्या १४ पैकी ८ महिला उमेदवार असल्याचे विशेषत्वाने नमूद करण्यात आले. तसेच ज्या प्रभागात उमेदवार नाहीत अशा जागांवर काही अपक्ष उमेदवारांना समर्थन देण्याच्या प्रस्तावावर चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले. चांदूर रेल्वेकरांच्या विकासासाठी एकजुटीने, प्रामाणिकपणे आणि सर्वसमावेशक दृष्टीकोनातून काम करणार असल्याची ग्वाही पक्ष पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिली. यावेळी आपचे नितीन गवळी, मेहमुद हुसैन, भाकपचे सतिष चौधरी, विनोद जोशी, प्रा. प्रसेनजित तेलंग, भुषण नाचवणकर, सागर दुर्योधन, माकपचे रामदास कारमोरे, स्व. डॉ. पांडूरंग ढोले विचारमंचचे डॉ. क्रांतीसागर ढोले, संजय डगवार, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रशांत शिरभाते, प्रहार जनशक्ती पक्षाचे सौरभ इंगळे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार नम्रता गवळी, आपचे मंगेश डाफ, सागर गावंडे आदी उपस्थित होते.

# पटसंख्येनुसार शिक्षक भरतीला उच्च न्यायालयाची मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

उच्च न्यायालयाने राज्य सरकारचा १५ मार्च २०२४ रोजीचा संचमान्यतेसंबंधी निर्णय वैध ठरवत पटसंख्येनुसारच शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा केला आहे. विद्यार्थ्यांची संख्या हा शिक्षक पदनिर्धारणाचा मुख्य आधार असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने हा निर्णय धोरणात्मक व प्रशासनिक



असल्याने हस्तक्षेप न करण्याचा निर्वाळा दिला. आरटीई कायदा हा मुलांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी असून शिक्षकांना विशिष्ट शाळेत कायम ठेवण्याचा अधिकार देत नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

सरकारने अतिरिक्त शिक्षकांना सेवेतून कमी न करता त्यांचे जवळच्या शाळेत समायोजन केले जाईल, अशी हमी दिली असून न्यायालयाने ती नोंद केली. पती-पत्नीला ३० किमी परिघात ठेवण्याचा १८ जून २०२४ चा शासन निर्णयही न्यायालयाने योग्य मानला. तसेच, विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यास शिक्षक पदे घटवणे आरटीईच्या तरतुदींशी सुसंगत असल्याचे म्हटले.

खासगी शाळांनीही हे नियम पाळणे बंधनकारक असून दहा विद्यार्थ्यांखालील शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक नेमण्याचा निर्णयही वैध ठरवण्यात आला. मात्र अतिरिक्त शिक्षकांना सक्तीची बदली करू नये, असा आदेश देत न्यायालयाने शिक्षकसंख्या संतुलन राखण्यावर भर दिला. या निर्णयामुळे राज्यातील शिक्षक भरती व समायोजन प्रक्रियेला स्पष्ट दिशा मिळाली आहे.

# गरम कपड्यांनी बाजारपेठ फुल्ल

## विविध प्रकारचे कपडे : वस्तू खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

दरवर्षीच्या तुलनेत यंदा हिवाळ्यात थंडीला उशिराने सुरू झाली असली तरी थंडीपासून बचाव करण्याकरिता वापरावयाच्या विविध प्रकारच्या गरम कपड्यांच्या खरेदीसाठी अमरावती शहरासह ग्रामीण भागातून ग्राहक येत असल्याने जिल्हा मुख्यालयातील अनेक तात्पुरत्या दुकानांमध्ये गर्दी दिसून येत आहे. मुख्य चौकातील मार्गांवर अनेक व्यावसायिकांनी दुकाने थाटल्याने बाजारपेठेचे स्वरूप आले आहे.



दिवाळीनंतर आता थंडीचा जोर वाढत चालला आहे. थंडीपासून संरक्षण म्हणून ऊबदार कपड्यांना मोठी मागणी असते. हिवाळ्यातील ऊबदार कपडे आणि विविध प्रकारच्या आधुनिक स्वेटरच्या माध्यमातून ग्राहकांना आकर्षीत करण्यासाठी छोटे-मोठे व्यावसायिक सरसावले असल्याचे दिसून येते. स्थानिक शहरात अनेक ठिकाणी आणि खास करुन जयस्तंभ चौक ते गांधी चौक रस्त्याचा दरम्यान विविध प्रकारच्या स्वेटरची दुकाने सजली आहेत.

पंजाबमधील लुधियाना येथून गरम कपड्यांची आवक केली जात आहे. याकामी चार-पाच व्यावसायिक असून जवळपास अनेकांना त्यांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाला आहे. खरेदीसाठी तरुणाई महाग व फॅशनेबल कपड्यांना पसंती देताना दिसत आहेत. तरुणाई एकत्रितपणे खरेदीसाठी येत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे दुकानेही फुललेली दिसतात. शहरातील थंडीत वाढ झाल्यामुळे बाजारात लोकरीच्या ऊबदार कपड्यांना मागणी वाढली आहे. लहानापासून ते ज्येष्ठांसाठीचे विविध डिझाईनचे स्वेटर व जॅकेट्स बाजारात उपलब्ध आहेत. जेन्ट्स, लेडीज स्वेटर, मफलर, स्कार्फ, लेस्कोटी, स्वेटकोटी, कुर्तापॅटर्न, सलवार सुट, जॅकेट, टी-शर्ट, जेन्ट्स मास्क फॅन्सी स्वेटर, हॅन्ड ग्लोव्हज, महिलांचे स्टोल, शॉल, सॉक्स, कानटोपी, हातमोजे, कानपट्टी, टोपी, कॅप्स अशा वस्तूंना मागणी आहे. यासह विविध प्रकारची कपडे तसेच बालकांसाठी खास गरम कपडे बाजारात गर्दी करून आहेत. ३० रूपयांपासून जवळपास पाच हजार रूपयांच्या जॅकेटपर्यंत वस्तू बाजारात आहेत. १५०, २००, २५०, ५०० रूपयापर्यंतच्या माफक दरातही योग्य वस्तू बाजारात उपलब्ध आहेत.

लहान मुलांच्या हातमोज्यांपासून ते विविध लहान-लहान सुंदर बंद गळ्याचे जॅकेट्स बाजारात उपलब्ध आहेत. मऊ कापसाचे सुंदर स्वेटर आणि क्विक ड्रायची मुलांचा थंडीपासून संरक्षण करण्यासाठी खरेदी केली जात आहे. थंडीमध्ये लहान मुले व ज्येष्ठांची जास्त काळजी घेतली जाते. अगदी पायाच्या नखापासून ते डोक्यापर्यंत लोकरीचे कपडे परिधान केले जातात. खासकरून विविध रंगसंगती असलेली वस्त्रे वापरण्याकडे महिलांचा कल वाढू लागला आहे.

आपल्या ड्रेसप्रमाणे आपला थंडीचा पेहराव असावा, असे महिलांना वाटते. महिलांसाठी विविध प्रकारचे स्वेटर, स्वेटर शर्ट, जॅकेट्स, हातमोजे, पायमोजे, स्टोल्स, कानपट्टी बाजारात आल्या आहेत. विविध डिझाईन व रंगामधील विविध प्रकारच्या सुट्सना महिलांकडून पसंती मिळत आहे.

**महिलांचा सिल्कच्या साड्यांकडे ओढा**

महिला नेत्या आणि कार्यकर्त्यांचा ड्रेस कोड मध्येही बदल झाला आहे. बैठका, समारंभ आणि जाहीर कार्यक्रमांसाठी सिल्कच्या आणि कॉटन सिल्कच्या साड्यांना पसंती दिली जात आहे.

# नेता एक नूर, कार्यकर्ता दस नूर; कडक कुर्त्यावर दररोज कार्यकर्त्यांचे नवीन जॅकेट

## नगरपालिका व नगर परिषदेच्या निवडणुकीत वाढली फॅशनची क्रेझ

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

जिल्ह्यातील दहा नगर परिषद आणि दोन नगर पंचायतीची निवडणूक होणार आहे. यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींसोबतच आता विविध पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या ड्रेस कोडमुळे चर्चेत आले आहेत. राजकारणात सादरीकरण महत्त्वाचे असल्याने, कार्यकर्त्यांनीही आता त्यांच्या पेहरावात मोठा बदल केला आहे.

पूर्वीचे शर्ट-पँट सोडून, आता खादी, कॉटन आणि लिनन यांसारख्या कापडातील कडक आणि नीटनेटका कुर्ता-पायजमा हाच नवीन गणवेश बनला आहे. हे कपडे आरामदायी, तर असतातच, पण त्याचबरोबर ते साधेपणा आणि प्रामाणिकतेचा संदेश देतात. या फॅशनमध्ये भर पडली आहे ती आता जॅकेटची. त्यामुळे प्रत्येक जण जॅकेटकडे अधिक लक्ष देत आहे.



**रेडीमेडमध्ये बरीच व्हरायटी**

कार्यकर्त्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन बाजारात रेडीमेड जॅकेट आणि कॉटनच्या शर्ट्सची मोठी व्हरायटी उपलब्ध झाली आहे. विशेषता ब्रँडेड आणि डिझायनर कपड्यांना मोठी मागणी आहे. कपड्यांची फिनिशिंग आणि टिकाऊपणा चांगला राहील, याकडेही लक्ष दिला जात आहे. याचबरोबर, अनेक जण परफेक्ट फिटिंगसाठी रेडीमेड घेण्याऐवजी कापड खरेदी करून शिऊन घेण्यालाही प्राधान्य देत आहेत. त्यामुळे टेलर्सच्या दुकानांतही गर्दी वाढली आहे.

**ड्रायक्लिनर्स, स्टार्चचा व्यवसाय तेजीत**

कार्यकर्त्यांना कडक आणि नीटनेटके कपडे हवे असल्याने त्याचा थेट फायदा लॉन्ड्री उद्योगाला झाला आहे. खादी आणि कॉटनच्या कपड्यांना योग्य आकार देण्यासाठी स्टार्च आणि इस्त्री करणे आवश्यक असते. त्यामुळे सध्या हा व्यवसाय तेजीत असून, अनेकांना वेळेवर कपडे देण्यासाठी अतिरिक्त कामगार नेमावे लागत आहेत. कार्यकर्त्यांचा या बदलत्या फॅशनमुळे अनेक लहान उद्योजकांना आर्थिक बळ मिळाले आहे.

# तिसऱ्या आघाडीची मैदानात दमदार एन्ट्री

## जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस-भाजपला शह देण्याची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९तिवसा**

तिवसा तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राजकीय समीकरणे जलदगतीने बदलू लागली असून सत्ताधारी काँग्रेस व विरोधी भाजप या दोन्ही पक्षांना शह देण्यासाठी तिसरी आघाडी एकत्र येण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. या संदर्भातील सर्वपक्षीय बैठक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १२ वाजता स्थानिक विश्रामगृहात आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती निमंत्रक आयोजक राष्ट्रवादी काँग्रेसचे भाई भूषण यावले यांनी दिली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचा बिगुल कोणत्याही क्षणी वाजू शकतो. तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुकीची पूर्वतयारी सुरू केली आहे. गेली दहा वर्षे सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाची विकासकामांतील नाकर्तेपणाची भूमिका, तर दुसरीकडे भाजपची मागील एका वर्षातील वादग्रस्त भूमिका यामुळे मतदारांमध्ये नाराजी वाढताना दिसते. या परिस्थितीला पर्याय म्हणून तिसरी आघाडी तिवसात वेगाने आकार घेत असून तालुक्याच्या राजकारणाला नवे वळण देण्याचे संकेत स्पष्टपणे दिसत आहेत.



या महत्त्वपूर्ण बैठकीस विविध प्रमुख पक्षांचे नेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने हजेरी लावणार आहेत. त्यामध्ये- राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट): हेमंत बोबडे, अजय सुरटकर, शिवसेना (उद्धव ठाकरे गट): विलासराव माहुरे, देविदास निकाळजे, प्रहार संघटना: संजय देशमुख, योगेश लोखंडे, बाळा देशमुख राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): दिलीपराव भुयार, प्रकाश पडोळे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष: कॉम्रेड दिलीप शापामोहन, कॉम्रेड महादेव गारपवार, भारतीय कम्युनिस्ट पक्ष: कॉम्रेड प्रकाश सोनोने, कॉम्रेड चंद्रकांत वडस्कर, वंचित बहुजन आघाडी: सागर भवते, प्रवीण निकाळजे, भारत दहाट, युवा स्वाभिमान पक्ष: धीरज केने, शिवसेना (एकनाथ शिंदे गट): राहुल लांजेवार, शैलेश डहाके, अजय आमले

या सर्व पक्षांनी आपापली भूमिका स्पष्ट करण्यासाठी व तालुक्यातील मतदारांना ठोस पर्याय देण्यासाठी तिसऱ्या आघाडीच्या माध्यमातून एकत्र येण्याची तयारी दाखविली आहे. बैठकीत आघाडीची रचना, निवडणूक रणनीती, संयुक्त कार्यक्रमपत्रिका आणि उमेदवारीसंबंधी महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची अपेक्षा आहे.

भाई भूषण यावले यांनी सांगितले की, तिसरी आघाडी ही काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांना सक्षम आणि कडवे आव्हान देणारी ठरेल. गेल्या काही वर्षांत दुर्लक्षित झालेल्या स्थानिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी आणि तालुक्याच्या विकासासाठी पर्यायी शक्ती म्हणून तिसरी आघाडी उभारण्याचा दृढनिश्चय त्यांनी व्यक्त केला.

२३ नोव्हेंबर रोजीची बैठक ही तिवसा तालुक्यातील राजकीय वातावरण तापवणारी ठरणार असून आगामी निवडणुकीत नव्या समीकरणांची चाहूल स्पष्ट दिसत आहे.

# अंजनगांव सुर्जी करांना हवा 'विकासाचा व्हिजन' असणारा लोकसेवक

## उमेदवार निवडून येतात आणि पाच वर्षे गायब होतात : शहराच्या विकासाचा ध्यास कुणाचा?

सचिन पाटील अब्रुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ अंजनगाव सुर्जी**

निवडणूक कोणतीही असली तरी मतदारांना भरमसाट आश्वासने, वचननामे आणि जाहीरनामे दिले जातातः परंतु निवडनुक झाल्यावर प्रत्यक्षात किती कामे होतात. याचे साक्षीदार हे भोळे- भाबडे नागरिक असतात. नगरपालिकेसाठी निवडला ' जाणारा लोकसेवक नेमका कसा असावा ? त्याला आपल्या मूलभूत समस्यांची किती जाण असावी ? आणि त्या सोडवण्यासाठी तो किती सक्षम असावा ? हा प्रश्न आता नागरिक विचारु लागलें आहेत.

'विकास' करणार हे आपण नेहमीच ऐकतोयः पण त्या मंडलीचे' व्हिजन' काय ते दिसत नाही. नागरिकांच्या मनात काय हे कोणीही सांगू शकत नाही; परंतु आता निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवार आप आपल्या प्रभागात डोकावण्याचा प्रयत्न करू लागले आहेत.



आजपर्यत केलेल्या कामांतील त्रुटीवर बोट ठेवले तर काहीच हाती लागणार नाही, अशी परिस्थिती शहरात आहे. आजवरच्या निवडणुकांत दिलेले शब्द आणि शहरातील आजची वास्तव परिस्थिती ही कोणीच बदलू शकले नाही, असे अंजनगाव सुर्जी करांचे म्हणणे आहे. ऐतिहासिक वारसा, विकासाचा अभाव, अंजनगाव शहराला ऐतिहासिक देवनाथ मठ 'व देशपांडे गढीचा वारसा लाभलेला आहे, पर्यटनाच्या दृष्टीने या शहराचे भविष्य उज्वल' करण्याची क्षमता लोकप्रतिनिधींमध्ये आहेः मात्र गेल्या काही वर्षात अंजनगाव शहर कुठे आहे आणि जिल्ह्यातील अन्य शहर कुठ पोहोचली? याचा गांभीर्याने ' विचार करण्याची वेळ आली आहे.

**निवडून या; पण गायब होवू नका**

निवडणूक होई पर्यंत 'आम्ही तुमचे आहोत, तुम्ही आम्हाला मते द्या असे सर्वच उमेदवार म्हणत असतात. याहीवर्षी नगर परिषदेच्या निवडणुकीत बहुतांश उमेदवार हात जोडून 'आमच्याकडेलक्ष द्या' असे म्हणत आहेत. परंतु यायेळेस जो अंजनगाव सुर्जी शहराचा विकास करेल, मतदारांच्या समस्या जाणून घेईल, पाणी, वीजपुरवठा नियमित करेल या उमेदवाराला मतदारही निवडून देतील, असे बोलले जात आहे. आता निवडणुकीत कोण जिंकेल, हा येणारा काळच सांगणार आहे.


**शहराच्या भावी उमेदवारांकडून नागरिकांना अपेक्षा**

या निवडणुकीत भावी नगरसेवकां कडून अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेतः अंजनगाव सुर्जी शहर छोटे, विकासाचे व्हिजन हवे मोठे' ही महत्त्वाची मागणी आहे. केवळ रस्ते किंवा दिवे लावणे म्हणजे विकास नव्हे. नागरिकांच्या मूलभूत आणि पायाभूत गरजा पूर्ण करणे गरजेचे आहे. रोजगार निर्मिती आणि उत्तम आरोग्यसेवा, शिक्षण पुरवणे हेच खरे विकासाचे निकष आहेत, राजकारणापलीकडे जाऊन.

समाजकारणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे पूर्वी सत्ताधारी आणि विरोधक एकत्र येऊन शहराच्या भल्यासाठी काम करत. पण दुर्दैवाने आज केवळ राजकारणाचे पीक फोफावले आहे.ज्यामुळे विकास खुंटला आहे.

शहराच्या मुलभूत सुविधांच्या विकासासोबतच आरोग्याच्या संदर्भातही प्रश्न उपस्थित झाले आहे.शहरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी वेळेवर नाल्यांची साफसफाई, शुद्ध पाणीपुरवठा आणि आरोग्य केंद्रात आवश्यक औषधी असणे गरजेचे आहे.

# २६ तारखेला युवा स्वाभिमान संघटनेची अमरावतीत महत्त्वाची बैठक; निवडणूक रणनितीवर निर्णय - आमदार रवी राणा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान संघटनेची महत्त्वाची बैठक २६ तारखेला अमरावतीत होणार असल्याची माहिती आमदार रवी राणा यांनी दिली. या बैठकीत संघटनेची भूमिका, निवडणूक धोरण आणि स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर निर्णायक चर्चा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार राणा म्हणाले की, शहरातील प्रत्येक प्रभागातील विद्यमान परिस्थिती, मतदारांचे मुद्दे, तसेच प्रचाराची दिशा काय असावी याबाबत निरीक्षक नेमण्यात आले असून त्यांना निवडणूक तयारीसंदर्भात विशिष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्या प्रभागात कोणत्या मुद्यावर निवडणूक लढवायची आणि कुठे कोणत्या उमेदवारास पाठिंबा द्यायचा यावर सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

भाजपासोबतची आघाडी महत्त्वाची असल्याचे नमूद करताना राणा म्हणाले, भाजप मोठा भाऊ आहे. त्यामुळे परस्पर सहकार्य वाढवूनच निवडणूक मजबूत लढवू. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांवर कोणाला पाठिंबा द्यायचा याबाबतचा अंतिम निर्णय कोअर कमिटीच्या बैठकीत घेतला जाईल.

या बैठकीमुळे अमरावतीतील आगामी राजकीय समीकरणांना दिशा मिळणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# चिन्ह नसल्याने अपक्षांची कोंडी चार दिवसांत प्रचार कसा शक्य?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

नामांकन छाननीनंतर राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपल्या प्रभागात प्रचाराला सुरुवात केली. मात्र, अपक्षांना तब्बल नऊ दिवस चिन्हांसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने आम्ही काय घेऊन फिरायचे, असा प्रश्न अपक्ष उमेदवारांनी केला आहे.

नगरपालिका निवडणुकीसाठी सोमवारी इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले. मंगळवारी सर्वच नामांकनाची छाननी झाली. प्रतिस्पर्धी कोण आहे, याविषयी माहिती झाल्याने उमेदवारांनी आपल्या प्रभागात प्रचार करायला सुरुवात केली आहे. मात्र, काही उमेदवारांना राजकीय पक्षांकडून उमेदवारी न मिळाल्यामुळे त्यांनी अपक्ष म्हणून वेळेवर उमेदवारी दाखल केली. छाननीनंतर हे नामांकन कायम आहेत. एकीकडे राजकीय पक्षांनी प्रचाराचा पहिला टप्पा गाठला असताना दुसरीकडे अपक्ष उमेदवारांना चिन्ह मिळायला उशीर होणार आहे. अशात ओळख प्रस्थापित करण्यासाठी आता नवखे आणि अपक्ष उमेदवारांना मात्र तारेवरची कसरत करावी लागत आहे. २६ नोव्हेंबरला अपक्ष उमेदवारांना चिन्ह मिळतील आणि त्यानंतर केवळ चारच दिवस प्रचाराला मिळणार आहे. त्यामुळे या चार दिवसांमध्ये मतदारांपर्यंत पोहचावे कसा असा प्रश्न आहे.



**चार दिवसांत मतदारांपर्यंत पोहोचायचे कसे ?**

चिन्ह मिळाल्यानंतर चार दिवसांत संपूर्ण प्रभाग प्रचारासाठी पिंजून काढावा लागणार आहे. प्रभागाची मतदारांची संख्या आणि भौगोलिक आकारामुळे अपक्ष उमेदवारांची गोची होणार आहे, हे मात्र निश्चित आहे. शहरातील एका प्रभागामध्ये तीन हजार मतदार आहेत.

**पुढील बुधवारी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होणार**

नामनिर्देशनपत्र १७ नोव्हेंबर रोजी दाखल झाले. १८ नोव्हेंबर रोजी छाननी आणि वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे. १९ ते २१ नोव्हेंबरदरम्यान नामनिर्देशनपत्र मागे घेता येणार आहेत. अपील असेल, तर त्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत कार्यवाही होणार आहे. २६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्ह नेमून दिले जाणार व उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होणार आहे. या तारखेपर्यंत अपक्ष उमेदवारांना चिन्हाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# दर्यापूर - मुर्तीजापूर रोडवर भीषण अपघात १४ वर्षीय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९दर्यापूर**

आज सकाळी साडेसातच्या सुमारास मुर्तीजापूर रोड टी-पॉईंटवरील डेपोसमोर मोटरसायकल क्रमांक MH 30 AD 4917 आणि ४०७ वाहन MH 27 X 1308 यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत शाळकरी विद्यार्थी शिवराज प्रतीक राळे (वय १४, रा. सोनखेड भुईखेळ) याचा जागीच मृत्यू झाला शिवराज हा एकविरा शाळा दर्यापूर येथे शिकत होता.



शिवराज आणि त्याचा मित्र शिवम नवलकर ट्युशनसाठी जात असताना मोटरसायकलचा इमर्जन्सी ब्रेक दाबल्याने अचानक वाहनाचा ताळमेळ सुटला आणि शिवराज थेट ४०७ वाहनाच्या मागील चाकाखाली गेल्याची प्राथमिक माहित सूत्रांकडून प्राप्त झाली आहे धडक इतकी भीषण होती की त्याचा तेथेच मृत्यू झाला. शिवराज ला शोविच्छेदनाकरिता ग्रामीण रुग्णालय, दर्यापूर येथे हलविण्यात आले आहे.

घटनास्थळी पसरलेले भीषण दृश्य पाहून परिसरात एकच खळबळ माजली. दर्यापूर पोलीस तपास करीत आहेत. आजचा हा अपघात पुन्हा एकदा दाखवून देतो की रस्त्यावरची एक चुकीची हालचाल एका निरागस जीवाला हिरावून घेऊ शकते. सावध रहा आपली आणि इतरांची सुरक्षितता आपल्या हातात आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत